श्री

अंकगणित.

दुसराभाग

अणगांक.

इसवीसन् १८६६.

मे.

शके १७८८ क्षय.
संवत्

वैशाखवद्य

मुक्काम मुंबई येथ काशिनाथबाळचंद्र खाडन याणी
आपले चंद्रप्रकाशशाळा
छापिलें.

अनुक्रमणिका.

समाप्त

अपूर्णांक.

कार्यप्रकाशकचिन्हें.

गणित आणि बीजगणित यांमध्यें कितीएककामाचीं प्रकाशक म्हणजे दाखविणारीं चिन्हें आहेत तीं लिहितों.

+ हें चिन्ह अधिक करण्याचें म्हणजे मिळविण्याचें, हें धनचिन्ह.

− हें उणें करण्याचें म्हणजे वजाकरण्याचें. हें ऋणचिन्ह.

× हें गुणण्याचें.

÷ हें भागण्याचें.

∷ हें राशिगणितकरण्याचें.

= हें म्हणजेशब्दाचें किंवा बराबर.

√ हें वर्गमूळ करण्याचें.

∛ हें घनमूळ करण्याचें.

यांचीं उपयोग स्थळें.

५+३ यांत ५ आणि ३ यांची मिळवणी करावी, असें मध्यचिन्ह दाखवितें.

६−२ यांत ६ तून २ उणे करावे, म्हणजे साहांत दोन वजा करावे.

७×३ यांत ७ नी तीन गुणावे, हें मध्यचिन्ह दाखवितें.

८÷४ यांत आठ चोंहोनी भागावे, असें मध्य चिन्ह दाखवितें.

२:३::४:६ यांत जसे दोन तिहींस तसे चार साहांस.

$७^{२}$ यांत सातांचा वर्ग करावा हें तो वरचा लहान अंक दाखवितो.

$८^{३}$ यांत आठांचा घन करावा हें तो वरचा लहान अंक दाखवितो.

$\sqrt{३}$ किंवा $३^{\frac{१}{२}}$ यांत तिहींचें वर्गमूळ करावें.

$\sqrt[३]{५}$ किंवा $५^{\frac{१}{३}}$ यांत पांचांचें घनमूळकरावें.

व्यवहारीअपूर्णांक.

कोणताही अवयवी किंवासंख्यापूर्ण अथवा अखंड जाणून, त्याचे कितीही खंड केलेतरी त्या खंडांचा सूचकास अपूर्ण म्हणतात. जसें, जर, मूळ अवयवीचे आठ भागकेलेतर त्याभागांतून ३, ५, ७,

इत्यादि भाग घेतात त्यांस अपूर्णह्मणतात; आणि त्याची लिहिण्याचीरीति याप्रमाणें आहे.

१/३, १/५, ५/७; इत्यादि. रेघेचाखालच्याआंगास जी संख्या आहे तीस छेद ह्मणतात, कांकीं मूळ अवयवी किती भागानी छेदिला आहे तें ती दाखविते आणिरेघेचावरच्या वरच्या आंगास जीसंख्या आहेतीस अंश असेंह्मणतात, कांकींमूळ अवयवींचा अपूर्णपणा दाखवाया साठीं त्याचेकेलेले छेदांतून किती भाग घेतले आहेत हें ती दाखविते. यारूपाच्यासंख्येस दशांश अपूर्णांकाचाभेद दाखवाया साठीं व्यवहारी अपूर्णांक असेंनावठेविलें आहे.

व्यवहारी अपूर्णांकांत कांहीं भेदआहेत; जसें, सम, विषम, भागजाती, प्रभागजाती, भागानुबंध अपूर्णांक इत्यादि.

समअपूर्णांक तोच होय, ज्यांत अंशछेदांहून उणे आहेत; जसें, १/२ अथवा ३/४ अथवा ३/८

विषम अपूर्णांक तोचहोय, ज्यांत अंश छेदांच्याबराबर किंवा अधिक आहेत; जसें, ३/३ अथवा ५/३ अथवा ९/७ याप्रकारास विषम असें नाव ठेवायाचें कारण हेंच आहे कीं, असा अपूर्णांक एकंचे बराबर किंवा एकापेक्षां अधिक आहे.

भागजाति अपूर्णांक तोचहोय, ज्यांत एकेसगळे वस्तूचा तुकडा केवळ अपूर्णांकच आहे; जसें, १/२ अथवा १/३.

प्रभागजाति अपूर्णांक तोचहोय, ज्यांतअपूर्णांकाचा अपूर्णांक, अथवाकित्येक अपूर्णांकांमध्यें चालिहूनजेजोडलेअसतात; जसें, ३/४ चा १/२ अथवा १/३ चे १/६ चे ३/५

भागानुबंध पूर्णांकतोचहोय, ज्यांत पूर्णांक लिहून त्यापुढें जवळच अपूर्णांक लिहिला आहे; जसें, ३ १/२ अथवा १५ ३/४ अथवा २१ ७/१२

मिश्र अपूर्णांक तोचआहे, ज्याचे अंश आणि छेद दोनही सम, विषम, अथवा भागानुबंध आहेत; जसें, १/२, अथवा २/३ अथवा ३/५ अथवा इत्यादि. हे सर्व मिश्र अपूर्णांक आहेत.

कोणत्याही पूर्णांकास छेदस्थळीं एक लिहिल्यानें अपूर्णांकाचें रूप तें; जसें, जर ३ या पूर्णांकास अपूर्णांकाचें रूपद्यावयाचें आहेतरत्या लिहिण्याची रीति ३/१ अशी आहे जसें ५/१ इत्यादि.

कोणताही अपूर्णांक भागाकार दाखविता; म्हणून अंशछेदांनीं गून जोभागाकार उत्पन्नहोतो त्याचे बराबर त्या अपूर्णांकाचा भावआहे.

जसें $\frac{१२}{४}$ या अपूर्णांकाचा भाव ३ याचे बरोबर आहे; आणि $\frac{२१}{५}$ याचा भाव ४ $\frac{१}{५}$ याचे बराबर आहे.

व्यवहारी अपूर्णांकाचा रूपभेद.

व्यवहारी अपूर्णांकाचा रूपभेद ह्मणजे त्यास एका रूपांतून किंवा नावांतून दुसऱ्या रूपांत किंवा नावांत आणण्याचा प्रकार आहे, आणि व्यवहारी अपूर्णांकाची मिळवणी, वजाबाकी इत्यादि करायासाठीं अगोदर त्यांस हा प्रकार केला पाहिजे; असा रूपभेद यावयाचे कितीएक प्रकार आहेत. आहेत.

कृत्य.

दोन किंवा अधिक संख्यांचा दृढ भाजक काढायाचें.

दोन किंवा अधिक संख्यांचा दृढभाजक तीच संख्या आहे, जीत्या संख्यांस निःशेष भागिते: जसें, १८ आणि २४ या दोन संख्या २, ३, ६, यांणीं निःशेष भागिल्या जातात, परंतु यांत मोठी संख्या ६ तीस दृढ भाजक ह्मणतात.

रीति

जर दोन संख्या मात्र असतील, तर त्यांत जी मोठी संख्या असेल ती लाहान संख्येने भागावी; नंतर, बाकी राहील तो नवा भाजक करून त्याणें पूर्व भाजक भागावा; याप्रमाणें शेवटील बाकीनें तत्पूर्वभाजक पुनःपुनः भागितां ज्या भाजकाने शेवटील भाज्य निःशेष होईल तो उच्छिलेसंख्यांचा दृढभाजक होय.

जेव्हां संख्या दोहोंपेक्षां अधीक असतील, तेव्हां त्यांतून पहिलेदोहोंचा पूर्वी सांगितल्याप्रमाणें दृढभाजक काढ; नंतर, हा दृढभाजक आणि राहिलेली संख्या यांचा दृढभाजक काढ: या रीतीनें जितक्या संख्या राहिल्या असतील त्यांचा दृढभाजक काढावा; ह्मणजे शेवटील दृढभा-

जक काढावा; म्हणजे शेवटील दृढभाजक जो उत्पन्न होतोतो सर्व सांगितल्या संख्यांचा दृढभाजक आहे.

जर असें होतें कीं, अशारीतीनें दृढ भाजक १ मात्र निघतो; तर - अशासंख्यांस अदृढभाजक ह्मणतात, म्हणजे त्यांस दृढभाजक नाहीं; अथवा असें म्हणतात कीं त्या संख्या परस्पर अविभाज्य* आहेत.

---

* अविभाज्य संख्या त्या आहेत, ज्यांस एकावांचून दुसरा भाजक निःशेषभागित नाहीं; जसें, २,३,५,७,११,१३,१७, इत्यादि. या संख्यांचाशोध पूर्वकाळापासून चालत आहे, आणि अशी संख्या जाणायासाठीं एक चांगलारीति आजच्या दिवशीं अपेक्षितआहे.

(इरातास्थेनीस्) यानामें एक मोठा ज्योतिषी मिश्रदेशांत होता, त्याणें या अपेक्षिता साठीं एक युक्ती काढिली, जीस त्याणें चालनी असें नाव ठेविलें; कांकी त्या युक्तीनें अविभाज्य संख्या इतर संख्यांहून निराळ्या करितां येतात, आणि अशारीतीस विषम म्हणतात कांकीं फार मोठ्या विस्तारा वांचून थोडक्यात सरळरीतीनें, कोणती ही संख्या आरंभ आहे कीं नाहीं हें समजतां येतनाहीं. अशी विस्तारशीति आजपर्यंत चालली आहे ती ही आहे.

एकापासून कोणतेही इछिले संख्येपावेतों सर्वविषम संख्या अनुक्रमानें लिही, जसें,

१	३	५	७	९	११	१३	१५	१७	१९
२१	२३	२५	२७	२९	३१	३३	३५	३७	३९
४१	४३	४५	४७	४९	५१	५३	५५	५७	५९
६१	६३	६५	६७	६९	७१	७३	७५	७७	७९
८१	८३	८५	८७	८९	९१	९३	९५	९७	९९

आतां प्रथमच्या अविभाज्य संख्ये पासून आरंभकर, आणि ती पासून तिसऱ्या संख्येवर एक एक बिंदुकर; कांकीं तीती संख्या तिहींनी निःशेष भागिली जाते. जसें, ९, १५, २१, इत्यादि.

नंतर पांचांपासून पांचवे पांचवे स्थळीं बिंदुकर, कांकीं तीती संख्या पांचानीं निःशेष भागिलीजाते. जसें, १५, २५, ३५, इत्यादि.

पुनः ७ पासून सातवे सातवे संख्येवर बिंदुकर, कांकी तीती संख्या सातांनी निःशेष भागिली जाते, जसें, २१, ३५, ४९, इत्यादि.

असेंकेलेंअसतां सर्वसंख्याज्या बिंदूवांचूनआहेत त्या अविभाज्य संख्याजाणाव्या; म्हणून ७आणि ४ १०० यादोहीं संख्यांच्या मध्यें कोणतीही अविभाज्य संख्यानाहीं; कांकीं जर कोणतीहीसंख्या कोणतेही अविभाज्यसंख्येनें निशेष भागिलीजातनाहीं, परंतु ती अविभाज्य संख्या अशी असावीकी सांगितल्या संख्येच्ये वर्गमूळापेक्षांउणी; तर असें जाणावेंकीं सांगितली संख्या स्वतः अविभाज्य संख्याहोय; सर्वसमसंख्यांमध्यें २ही समसंख्यामात्र अविभाज्य संख्या आहे, ह्मणून दोहोंपासून १००पर्यंतपुढें सांगतों या संख्या अविभाज्य संख्याआहेत; २,३,५,७,११,१३, १७.१९,२३,२९,३१,३७, ४१,४३,४७.५३,५९,६१,६७,७१.७३,७९, ८३, ८९,९७,

या चालनीवांचून दुसरी थोडक्यात कोणतीहि रीतिनाहीं, कीं जिणेंकरून अविभाज्यसंख्या समजातयेईल; म्हणजे आजपावेतो ज्योतिषामध्यें अशी रीतिसापडलीनाहीं.

उदाहरणें.

प्रथम, १९०८, ९३६, आणि ६३० यांचा दृढभाजक काढ.

९३६) १९०८ (२ म्हणजे १९०८ आणि ९३६ यांचा दृढभाजक ३६ आहे.
१८७२

३६) ९३६ (२६ नंतर ३६) ६३० (१७
७२   ३६
२१६   २७०
२१६   २५२
..   १८) ३६ (२
३६

याजकरितां सांगितल्या संख्यांचा दृढभाजक १८ आहे.

दुसरें. २४६ आणि ३७२ यांचा दृढभाजक काय ?

उत्तर, ६

तिसरें, ३२४, ६१२ आणि १०३२ यांचा दृढभाजक काय ?

उत्तर. १२

प्रथमप्रकार.

अपूर्णांकाचा अतिसंक्षेप करायाचा.

⁂ सांगितल्या पूर्णांकाच्या पदांस कोणत्याही संख्येनें भाग, कीं जिणें निःशेषहोईल; नंतर जे भागाकार येतील त्यांस तशारितीनें दुसरे संख्येनें भाग; असें पुढेंही कर जों पर्यंत एकावांचून दुसरे कोणतेहीसंख्ये

⁂ स्पष्ट आहेकीं जरसांगितल्या अपूर्णांकांचे पदांस भलत्या एकाच अंकानें भागिलें तर दुसरा अपूर्णांक उत्पन्नहोईल, त्याचाभावसांगितल्या अपूर्णांकाबरोबर होईल. आणि अशारितीनें जोंचालेल तों पुनःपुनः भागाकार केला आहे. अथवा भाजक अतिदृढ आहे ते व्हां ही स्पष्ट आहे कीं नवीं अपूर्णांकाचीं पदें जीं उत्पन्न होतात त्या पेक्षां संक्षेप पडायास अशक्य.

पाहा, १, कोणत्याही संख्येचा शेवटीं जरसम अंक अथवा शून्य असेल, तर ती सर्वसंख्या २ यांनी भागिली जाईल.

२, कोणत्याही संख्या ज्याच्या शेवटीं ५ किंवा ० आहे त्या सर्व ५नी भागिल्या जातील.

३, जर कोणत्याही संख्येच्या उजवे कडे शेवटीं ० आहे तर त्या सर्व संख्या १०नीं भागिल्या जातील; जर दोन शून्यें असतील तर त्या सर्वसंख्या १००नीं भागिल्या जातील; जर तीन शून्यें असतील तर १०००नी भागिल्या जातील आणि असें पुढेंही, म्हणजे असा भागाकार करायासाठीं शून्यें मात्र काढिलीं पाहिजेत.

४, जर कोणतेही संख्येचे शेवटील दोन अंक चोंहोंनी भागिले जातील तरतीसर्व

नें भागितां नयेईल, ह्मणजे ते शेवटील भागाकार सांगितल्या अपूर्णांक प दांचा संक्षेप झाला.

अथवा सांगितल्या अपूर्णांकाचे पदांस त्यांच्या दृढभाजकानें एकदां च भाग मग अशारीतीनें जे भागाकार येतील तीं इच्छिले अपूर्णांकाचीं प दें सांगितले अपूर्णांकाच्या पदांबराबर आहेत.

उदाहरणें.

प्रथम, $\frac{२१६}{२८८}$ यांस अतिसंक्षेपरूपदे.

$\frac{२१६}{२८८}=\frac{७२}{९६}=\frac{३६}{४८}=\frac{१२}{१६}=\frac{६}{८}=\frac{३}{४}$ हेंउत्तर.

अथवायाप्रमाणें.

२१६)२८८(१ या करितां दृढभाजक ७२ आहे.
  २१६
  ७२)२१६(३ आणि ७२)$\frac{२१६}{२८८}=\frac{३}{४}$ हें उत्तर वरचेसारिखेंं.
    २१६
    ...

संख्या चोहोनी भागिलीजाईल. आणि शेवटील ३ अंकजर ८ नीभागिले जातील तर - ती सर्व संख्या आठांनी भागिली जाईल. असेंपुढेंही.

५, जर कोणतेही संख्येचे सर्व अंकाची बेरीज तिहीनी किंवा नवांनी भागिलीजाईल तर ती सर्व संख्या तिहींनीं किंवा नवांनी भागिली जाईल.

६. जर उजवे शेवटीचाअंक समआहे; आणि सर्व अंकांची बेरीज ६नीं भागिली जाईल. तरीती सर्व संख्या साहानीं भागिली जाईल.

७. जर कोणत्याही संख्येचे विषम स्थळींचे अंकाची बेरीज समस्थळींचे अंकांचे बेरजे बराबर आहे. तरती सर्व संख्या ११ नी भागिली जाईल.

८, जर कोणतीही संख्या आपल्या वर्गमूळाहून उण्या संख्येनें निःशेष भागिली जातनाहीं. तर ती अविभाज्य संख्याजाणावी. ती एकावांचून कोणत्या ही अंकानें भागायास अशक्य.

९. दोन आणि पांच यांशिवाय सर्वअविभाज्य संख्यांचे एकंचेस्थळीं हे अंक असतात, १, ३, ७, किंवाः ९; आणि यांशिवाय दुसऱ्या सर्वसंख्या ८ कं पुरेंटः आहेत ह्मणून भागिल्या जातील.

१०. जेव्हां कोणत्याही संख्या धन किंवा ऋणचिन्हांनी जोडिल्या असून, त्यास कोणतेही दुसरे संख्येनें भागायाचें आहेतर या प्रत्येक संख्येस वेगळेंवगळें भागिलें पाहिजे; जसें $\frac{१०+८-४}{२}=५+४-२=७$

११, परंतु जो संख्या गुणाकाराच्या चिन्हानें जोडिली आहे तर त्यांतील एकचसंख्या भागावी. जसें.

१०+८+३ = १०+४+३ = १०+४+३ = १+३+१ = ३० = २०

दुसरें, $\frac{१९५}{७८०}$ यांस अतिसंक्षेप रूपदे.

उत्तर, $\frac{१}{४}$

तिसरें, $\frac{१३६}{२०४}$ यांस अतिसंक्षेपरूपदे.

उत्तर, $\frac{२}{३}$

चवथें, $\frac{५२५}{६३०}$ यांस अतिसंक्षेप रूपदे.

उत्तर, $\frac{५}{६}$

दुसरा प्रकार.

भागानुबंध पूर्णांकास बरोबर भावाचें विषम अपूर्णांकाचें रूप द्यावयाचा.

* पूर्णांकास अपूर्णांकाचे छेदानीं गुण आणि त्या गुणाकाराशीं अंश मिळीव; नंतर ही बेरीज अपूर्णांकाचे वरले भागास अंशस्थळीं लिही, म्हणजे इच्छिलें काम झालें.

उदाहरणें.

प्रथम, २३ $\frac{२}{५}$ यांस बराबर भावाचें अपूर्णांकाचें रूप दे.

$\frac{२}{५}$ अथवा याप्रमाणें $\frac{(२३\times५)+२}{५}=\frac{११७}{५}$ हें उत्तर.

दुसरें, १२ $\frac{७}{९}$ यांस बराबर भावाचें अपूर्णांकाचे रूप दे.

उत्तर, $\frac{११५}{९}$

तिसरें, १४ $\frac{७}{१०}$ यांस बराबर भावानें अपूर्णांकाचेंरूपदे.

उत्तर, $\frac{१४७}{१०}$

चवथें, १८३ $\frac{५}{२१}$ यांस बराबर भावाचें अपूर्णांकाचेंरूपदे. उत्तर, $\frac{३८४८}{२१}$

* स्पष्ट दिसतें कीं वरची रीति उघडी आहे, कां कीं कोणत्याही अवयवीस असल्यास संख्येनें गुणावें आणि तो गुणाकार त्याच संख्येनें भागावा हीं दोनही बराबर भावाचीं आहेत म्हणजे असतें हा अपूर्णांक हेंच दाखवितात, कीं अंशास छेदानें भागावें.

तिसरा प्रकार.

विषम अपूर्णांकास बरोबर भावाचें पूर्णांकाचें अथवा भागानुबंध पूर्णांकाचें रूप द्यावयाचा.

* अंश छेदानीं भाग, भागाकार येईल तो इच्छिला पूर्णांक अथवा भागानुबंध पूर्णांक होईल.

उदाहरणें.

प्रथम, $\frac{१२}{३}$ यांस बरोबर भावाचें रूप दे.

आतां $\frac{१२}{३}$ अथवा १२÷३=४ हें उत्तर,

दुसरें, $\frac{१५}{७}$ यांस बरोबर भावाचें रूप दे.

आतां $\frac{१५}{७}$ अथवा १५÷७=२ $\frac{१}{७}$ हें उत्तर.

तिसरें, $\frac{७५९}{१७}$ यांस बरोबर भावाचें रूप दे.

याप्रमाणे १७)७५९(४४ $\frac{१}{१७}$ हें उत्तर.

```
    ६८
    ──
     ६९
     ६८
     ──
      १
```

चवथें, $\frac{५६}{७}$ यांस बरोबर भावाचें रूप दे.

उत्तर. ८

पांचवें, $\frac{१३६२}{२५}$ यांस बरोबर भावाचें रूप दे.

उत्तर. ५४ $\frac{१२}{२५}$

साहावें, $\frac{२९१८}{१७}$ यांस बरोबर भावाचें रूप दे.

उत्तर, १७१ $\frac{११}{१७}$

चौथा प्रकार.

पूर्णांकास बरोबर भावाचें अपूर्णांकाचें रूप द्यावयाचा, ज्याचे छेद सांगितले संख्येबरोबर होतील.

---

* स्पष्ट आहे की, ही रीति पूर्वरीतीचीच उलट आहे; आणि ह्याचें कारण सरळ भागाकाराचे गुणापासून प्रकट आहे.

* पूर्णांकास सांगितले छेदानीं गुण; आणि त्यागुणाकाराखालीं सांगितले छेदलिहि, ह्मणजे इच्छिले अपूर्णांक रूपझालें.

उदाहरणें.

प्रथम, यांसबरोबर भावाचें अपूर्णांकाचें रूपदे, ज्यास छेद ७ होतील.

आतां ९+७=६३; तेव्हां $\frac{६३}{७}$ हें उत्तर.

म्हणजे $\frac{६३}{७}$ = ६३÷७ = ९ हा ताळा.

दुसरें, १२ यांस बरोबर भावाचें अपूर्णांकाचें रूपदे, ज्यास छेद १३ होतील. उत्तर, $\frac{१५६}{१३}$

तिसरें, २७ यांसबरोबरभावाचें अपूर्णांकाचें रूपदे. ज्यास छेद ११ होतील.

उत्तर, $\frac{२९७}{११}$

पांचवा प्रकार.

प्रभागजाति अपूर्णांकास बरोबर भावाचें भागजाति अपूर्णांकाचें रूप द्यावयाचा.

*; अंशाकरितां सर्व अंशपरस्परगुण. आणि छेदांकरितां सर्वछेद परस्पर गुण. ते नवे अंश छेदइच्छिले अपूर्णांक रूपझालें.

प्रभागजाति अपूर्णांकामध्यें जरपूर्णांक अथवा भागानुबंधपूर्णांक असेल. तर त्यास पूर्वरीतीनें अपूर्णांकाचें रूपद्यावें.

जर अपूर्णांकांतील भलतीं अंशछेदरूप दोन पदें भलते एका अंकानें निःशेषभागिलीं जातील तरते भागाकार त्यांचे स्थळीं कामांत घेतां येतील; अथवा अंशछेदरूप कोणतीही दोन पदें समान असतील तरतीं रद्दकरितां येतील.

---

* यांत गुणाकार आणि भागाकार हे दोनही कामांत आणिले आहेत, याजकरितां उत्पन्न झालेलें फळ सांगितले अवयवींचें बरोबर भावाचें, होईल.

---

*; यारीतीच्या सत्यता याप्रमाणे दाखविली जाते, सांगितले प्रभाग जाति अपूर्णांक [illegible] चे [illegible] असावे. आतां [illegible] चा [illegible] = [illegible] = [illegible]; याजकरितां [illegible] चे [illegible] = [illegible] + [illegible] = [illegible]; ह्मणजे या अपूर्णांकाचे अंश सांगितले अपूर्णांकोचे अंशाचे गुणाकाराबरोबर आहेत, आणि याचे छेद सांगितले अपूर्णांकाचे छेदांचे गुणाकारा बराबर आहेत. तेव्हां प्रभागजातिअपूर्णांकांत दोहोंपेक्षां अधिक रकमा आहेत, तेव्हां वरप्रमाणें दोन रकमांस भागजाति रूपदेऊन त्यांसि तिसरीरकमजोडून ह्मि हि त्या तीन रकमांचे बराबर भावाच्या होतील; याप्रमाणें अधिक असतील तरीही.

उदाहरणें.

प्रथम, $\frac{३}{४}$ चे $\frac{२}{३}$ चा $\frac{१}{२}$ यांस बराबर भावाचें भागजाति अपूर्णांकाचें-रूप दे.

आतां $\frac{३+२+१}{४+३+२} = \frac{६}{२४} = \frac{१}{४}$ हें उत्तर.

अथवा $\frac{३+२+०}{४+३+२} = \frac{१}{४}$ दोनठिकाणीं २ आणि दोनठिकाणीं ३ रद्द केल्यानें.

दुसरें, $\frac{१०}{११}$ चे $\frac{३}{५}$ चे $\frac{२}{३}$ यांस बराबर भावाचें भागजाति अपूर्णांकाचें रूप दे.

आतां $\frac{१०+३+२}{११+५+३} = \frac{६०}{१६५} = \frac{४}{११}$ हें उत्तर,

अथवा $\frac{१०+३+२}{११+५+३} = \frac{४}{११}$ वरच्याप्रमाणें दोनठिकाणीं ३ रद्द करून आणि दोन स्थळीं ५ नीं भागून.

तिसरें, $\frac{४}{५}$ चे $\frac{३}{७}$ यांसबराबर भावाचें भागजाति अपूर्णांकाचें रूपदे.

उत्तर, $\frac{१२}{३५}$

चवथें, $\frac{५}{९}$ चे $\frac{३}{५}$ चे $\frac{२}{३}$ यांस बराबर भावाचें भागजाति अपूर्णांकाचें रूपदे.

उत्तर, $\frac{२}{९}$

पांचवें, ३ $\frac{१}{२}$ चे $\frac{५}{८}$ चे $\frac{२}{५}$ यांसबराबर भावाचें भागजाति अपूर्णांकाचें रूपदे.

उत्तर, $\frac{७}{८}$

साहावें, ४ चे ३ $\frac{१}{२}$ चे $\frac{५}{८}$ चे $\frac{३}{७}$ यांस बराबर भावाचें भागजाति अपूर्णांकाचें रूपदे,

उत्तर, २ $\frac{१}{२}$

सातवें, $\frac{५}{६}$ चे $\frac{७}{५}$ आणि २ यांसबराबर भावाचें भागजाति अपूर्णांकांचें रूपदे.

उत्तर, २ $\frac{१}{३}$

साहावा प्रकार.

वेगळे वेगळे छेदांचे अपूर्णांकास बरोबर भावाचे अपूर्णांक रूप द्यावयाचा- ज्याचे छेद सम होतील.

नवे अंशाकरितां, प्रति अपूर्णांकाचे वेगळे वेगळे अंश त्याचे त्याचे खा-लचे छेदांवांचून सर्व छेदानीं गुण; आणि समछेदांकरितां सर्व छेदा

स परस्परगुण. *

पाहा, याकामांत आणि दुसरे कितीएक कामांत जर सांगितलेसंख्यामध्यें पूर्णांक, अथवा भागानुबंध पूर्णांक, किंवा प्रभागजाति अपूर्णांक असतील तर त्यांस आरंभीं सांगितले पूर्वरीतीं करून सरळ अपूर्णांकाचें रूप दिलेंपाहिजे.

उदाहरणें.

प्रथम, $\frac{१}{२}$, $\frac{२}{३}$ आणि $\frac{३}{४}$ यांस बरोबर भावाचें समछेद अपूर्णांक रूपेंद.

१ + ३ + ४ = १२ हा $\frac{१}{२}$ चा नवा अंशआहे.
२ + २ + ४ = १६ हा $\frac{२}{३}$ चा नवा अंश आहे.
३ + २ + ३ = १८ हा $\frac{३}{४}$ चा नवाअंश आहे.
२ + ३ + ४ = २४ हा सर्वांचासमछेद आहे.

याजकरितां सांगितले वेगळे वेगळे अपूर्णांकांचेबराबरभावाचे हे अपूर्णांक आहेत. $\frac{१२}{२४}$, $\frac{१६}{२४}$ आणि $\frac{१८}{२४}$

अथवा हेंकाम मनांत गुणाकार करून वेगळाल्या रकमा एकदांच लिहितां येतील, जसें, $\frac{१}{२}$, $\frac{२}{३}$, $\frac{३}{४}$ = $\frac{१२}{२४}$, $\frac{१६}{२४}$, = $\frac{१८}{२४}$, अथवासंक्षेपानें = $\frac{६}{१२}$, $\frac{८}{१२}$, $\frac{९}{१२}$.

जेव्हां नवे अंश आणि समछेद यांचा दर्दाकंवा साधारण भाजक असेल, तरत्या वेगळाले संख्यांचे स्थळीं त्यांचे त्यांचे कर्तेलिहि, नंतर असेवेगळेवेगळे कर्तेजे अंश आणि छेद या दोन स्थळीं साधारण आहेत त्यांस त्या त्या स्थळांतून रद्दकर, म्हणजे अपूर्णांकास अतिसंक्षेपरूपझालेंज्यापासून समछेद होतील.

दुसरें, $\frac{१}{४}$, $\frac{१}{६}$ आणि $\frac{१}{८}$ यांसबरोबर भावानें समछेद अपूर्णांकरूपेंद.

आतांया अपूर्णांकांस सांगितलेप्रमाणे समछेदकरून हेंरूपहोतें.

$\frac{६ + ८}{४ + ६ + ८}$ $\frac{४ + ८}{४ + ६ + ८}$, $\frac{४ + ६}{४ + ६ + ८}$, आतां २, आणि २, यासंख्या ४, ६, आणि ६, ८, यांचे अनुक्रमें भाजक आहेत; याजकरितां जर प्रथमआणि तिसरे या अपूर्णांकांत ६ टाकून त्यांचेकर्ते २, आणि ३ हे लिहिले, आणि दुसरे अपूर्णांकांत ६, ४, आणि ८, यांस टाकून त्यांचेस्थळीं त्यांचे

---

* यापासून स्पष्ट आहे कीं, अंश आणि छेद हे एकच संख्येनें गुणिल्या पासून जोनवा अपूर्णांक उत्पन्न होतो. तो पूर्व अपूर्णांकांचेच भावाचा, त्याचेवरचे भावांत भेदहोत नाहीं.

वेगळाले कर्ते २ आणि ३ हे लिहिले. तरत्या अपूर्ण अंकास हें रूप होईल. $\frac{२+३+९}{४+२+३+९}$, $\frac{२+२+३+३}{४+२+३+९}$, आणि $\frac{४+२+३}{४+२+३+९}$, एथें २ आणि ३ हे दोन कर्तेजे अंश आणि छेद यांत साधारण आहेत त्यांस रद्द करून अपूर्णांकास हें रूप होतें. $\frac{९}{४+९}$, $\frac{२+३}{४+९}$, $\frac{४}{४+९}$, म्हणजे = $\frac{९}{३६}$, $\frac{६}{३६}$, आणि $\frac{८}{३६}$ यांतजी ३६ समछेद संख्या उत्पन्न झालीती ४, ६, ९, यांचा साधारण गुणाकार आहे. अथवा यासंख्यांनीं ती निःशेष भागिलीजाते. आणियाशिवाय कोणतेही दुसरे सांगितले संख्यांचा लघुतम साधारण गुणाकार उत्पन्न होईल. परंतु अशासंख्या छेद असून त्यांचे अंशस्थळीं १ असावा.

परंतु लघुतम साधारण गुणाकार त्वरेनें काढायाची रीतीहा आहे.

सांगितल्या संख्या एक ओळींत लिहि, आणि जर त्यांतील २ किंवा अधिक संख्या २या अविभाज्य संख्येनें भागल्याजातात. तर त्यांसभागून त्यांचे भागाकार त्यांचे त्यांचे खालीं दुसरे ओळींत लिहि, आणि ज्या भागांत नाहींत त्या त्यांचे खालीं दुसरे ओळींत पुनः लिहि; = या दुसरे ओळीस तसेंच २नीं भाग पुढेंतिसरीस, इत्यादि. असेंकरितांजर २या संख्येनें भागिल्याजाततनाहींतर ३या अविभाज्य संख्येनें भाग त्याणेंहीसर्वभागत नाहींतर ५, ७, इत्यादि अविभाज्य संख्यांनी भाग जोंपर्यंत दोनसंख्य भागल्यावांचून राहतील. नंतर ते सर्वभाजक आणि शवटील ओळींतील भागाकार व भागल्यावांचून राहिलीसंख्या हे सर्वपरस्पर गुणून जो गुणाकार होइल तो लघुतम साधारण गुणाकारहोय.

उदाहरण, ७, २४, ४०, ४५, आणि ७२ यांचा साधारणगुणाकार काढ.

२)	७	२४	४०	४५	७२
२)	७	१२	२०	४५	३६
२)	७	६	१०	४५	१८
३)	७	३	५	४५	९
३)	७	१	५	१५	३
५)	७	१	५	५	१
५)	७	१	१	१	१

तेव्हां २+२+२+३+३+५+७ = २५२० हा इच्छिला लघुतम-साधारणगुणाकार आहे, अथवा ७ २४, ४०, ४५, आणि ७२च्या

सर्व संख्यानीं हा निःशेष भागाकार शक्य आहे.

दुसरें. २७. ६६. १३५, २७५. आणि. ६७५. याचा लघुतम साधारण गुणाकार काढ.

३)	२७	६६	१३५	२७५	६७५.
३)	९	२२	४५	२७५	२२५
३)	३	२२	१५	२७५	७५
५)	१	२२	५	२७५	२५
५)	१	२२	१	५५	५
११)	१	२२	१	११	१
	१	२	१	१	१

तेव्हां ३+३+३+५+५+११+२=१४८५० हा इच्छिलेला लघुतम साधारण गुणाकार आहे.

जेव्हां अपूर्णांक अथवा भागानुबंध पूर्णांक सांगितले आहेत, तेव्हा शेवटन्यास विषम अपूर्णांकाचें रूपदे; आणि अतिसंक्षेप समछेद कर; नंतर अंशांचे लघुतम साधारण गुणाकारास अशा अतिसंक्षेप सम छेदानें भागून जो भागाकार येईल तो इच्छिला अंश अपूर्णांकांचा लघुतम साधारण गुणाकार झाला.

उदाहरण, ४ $\frac{१}{६}$. ५ $\frac{१}{३}$ आणि $\frac{५}{९}$ म्हणजे $\frac{२५}{६}$. $\frac{१६}{३}$. $\frac{५}{९}$ यांचा लघुतम साधारण गुणाकार काढ.

अपूर्णांकांस अतिसंक्षेप समछेद करून हें रूप होतें $\frac{७५}{१८}$. $\frac{९६}{१८}$ आणि $\frac{१०}{१८}$ आणि, ७५, ९६, १० यांचा लघुतम साधारण गुणाकार २४०० आहे. त्यास १८ यांणीं भागून भागाकार १३३ $\frac{१}{३}$ हा इच्छिला लघुतम साधारण गुणाकार झाला.

जेव्हां सांगितले दोन अपूर्णांकांतील एकाचा छेद दुसऱ्याचें छेदास निःशेष भागितो, तेव्हां त्या लहान अपूर्णांकाचीं दोनही पदें त्या भागाकारानें गुण. म्हणजे दोन ही सम छेद झाले.

जसें $\frac{३}{४}$ आणि $\frac{५}{८}$ यांस समछेद करायासाठीं लाहान अपूर्णांक यास २ नीं म्हणजे ८ ÷ ४ = २ यांणीं गुणायाचें इतकेंच मात्र आहे. असें करून त्यांस हें रूप होतें, $\frac{६}{८}$ आणि $\frac{५}{८}$

आणि $\frac{२}{३}$, $\frac{५}{६}$, $\frac{११}{१२}$ यांससमछेद करायासाठीं $\frac{२}{३}$ यांचीं दोन पदें ४ यांणीं गुणायाचीं, आणि $\frac{५}{६}$ याचीं २नीं इतकेंमात्र आहे; ह्मणजे असें करून त्याचें हें इच्छिलें रूपझालें, $\frac{८}{१२}$, $\frac{१०}{१२}$, $\frac{११}{१२}$.

अथवा याप्रमाणें.

सांगितले अपूर्णांकास अतिसंक्षेपरूप देऊन, छेदांचा लघुतमसाधारण गुणाकार काढ, नंतर त्या गुणाकारास वेगळाले सांगितले छेदानीं-भागून, जेजे भागाकार येतील, ते त्याचेत्याचे अंशानें गुण; नंतर त्यात्यागुणाकार अंशा खालीं लघुतम साधारण गुणाकार लिहि, म्हणजे सांगितले अपूर्णांकास बरोबर भावाचें अति संक्षेप समछेद रूप झालें.

उदाहरण, $\frac{३}{१४}$, $\frac{५}{२२}$, आणि $\frac{१०}{१२१}$ यांस अतिसंक्षेप समछेदरूप दे.

१४, २२, १२१ यांचालघुतम साधारण गुणाकार = १६९४

$$\left.\begin{array}{l}\frac{१६९४}{१४} = १२१ \\ \frac{१६९४}{२२} = ७७ \\ \frac{१६९४}{१३१} = १४\end{array}\right\}$$ हे तीन वेगळाले भागाकार ज्याणींअंश गुणायाचे आहेत.

तेव्हां
$$\left.\begin{array}{l}१२१+३ = ३६३ \\ ७७+५ = ३८५ \\ १४+१० = १४०\end{array}\right\}$$ हे. इच्छिले अंश आहेत.

आणि $\frac{३६३}{१६९४}$, $\frac{३८५}{१६९४}$, $\frac{१४०}{१६९४}$, हे इच्छिले अतिसंक्षेपसमछेद रूपाचे अपूर्णांक झाले.

पाहा, अपूर्णांकांस समछेदरूप दिल्यानें त्यांत अधिक भावाचा कोणता आहे हें ही सत्वर कळतें, जर $\frac{३}{७}$ $\frac{५}{९}$ यांस समछेदरूप $\frac{२७}{६३}$, $\frac{३५}{६३}$, हें दिल्यानें $\frac{५}{९}$ हे अधिक भावाचे आहेत हें उघड समजतें, कांकीं $\frac{३५}{६३}$ हे $\frac{२७}{६३}$ यांहून अधिक आहेत.

दुसरींउदाहरणें.

प्रथम, $\frac{२}{७}$ आणि $\frac{५}{९}$ यांस बरोबर भावाचेंसमछेदअपूर्णांकरूपदे.

उत्तर, $\frac{१८}{६३}$, $\frac{३५}{६३}$.

दुसरें. $\frac{२}{३}$, $\frac{३}{५}$ आणि $\frac{३}{७}$ यां बरोबर भावाचें समछेद अपूर्णांक

रूपदे.

उत्तर, $\frac{४०}{६०}, \frac{३६}{६०}, \frac{४५}{६०}$,

तिसरें, $\frac{५}{६}$, $२\frac{३}{५}$ आणि ४ यांस बरोबरभावाचें समछेद अपूर्णांक रूपदे.

उत्तर, $\frac{२५}{३०}, \frac{७८}{३०}, \frac{१२०}{३०}$.

चवथें, $\frac{३}{२५}$ आणि $\frac{४}{३५}$ यांस बरोबर भावाचें समछेद अपूर्णांक रूपदे.

उत्तर, $\frac{२१}{१७५}$ आणि $\frac{२०}{१७५}$.

पांचवें, $\frac{३}{७}$ आणि $\frac{५}{१४}$ यांसबरोबर भावाचें समछेद अपूर्णांक रूपदे.

उत्तर, $\frac{६}{१४}$ आणि $\frac{५}{१४}$.

साहावें. $\frac{२}{३}$ $\frac{३}{४}$ आणि $\frac{७}{८}$ यांसबरोबर भावाचें समछेद अपूर्णांक रूपदे.

उत्तर. $\frac{१६}{२४}, \frac{१८}{२४}$, आणि $\frac{२१}{२४}$.

सातवा प्रकार.

मिश्रअपूर्णांकांस शुद्धअपूर्णांकाचेंरूप द्यावयाचा.

अपूर्णांकांचे दोनही अवयवांत सरळ अपूर्णांकाचें रूपदे; नंतर प्रत्यंकाचा अंश दुसऱ्याच्या छेदानें गुण, हें काम पूर्वप्रमाणेंच आहे, एक एक अवयव बरोबर संख्येनें गुणिला असतां भावांतभेद होतनाहीं.

जसें, $\frac{\frac{५}{३}}{२} = \frac{५}{६}$ आणि $\frac{२\frac{१}{३}}{४} = \frac{७}{१२}$ आणि $\frac{३}{४}\frac{\frac{३}{५}}{२} = \frac{१७}{\frac{५}{\frac{६}{२}}} = \frac{१७}{५} + \frac{२}{६} = \frac{३८}{१५}$

आठवा प्रकार.

कोणतेही अपूर्णांकाचा भाव आपले पूर्णांकाचे अवयवांत काढायाचा.

पूर्णांकांत जर अनेक भावांचे अवयव आहेत तर त्यांस विविधगुणाकार रीतीनें अंशांस गुणावें, आणि तो गुणाकार विविध भागाकार रीतीनें छेदानें भाग.

अथवा जर पूर्णांक कोणतेही भावाचा १ या संख्येचा असेलतर, त्यांत त्याचे खालचे भावाचे किती अवयव आहेत त्या संख्येनें अंश गुणावा, आणि तो गुणाकार छेदानें भागावा. नंतर जरकांहीं शेष राहील, तर त्या भावाचा खालचे भावाचे अवयव त्या एकांत कितीआ

हेत त्या संख्येनें शेष गुणावें. आणि तो गुणाकार पूर्व प्रमाणें छेदानीं भागावा, इच्छा असेल त्यापावेतों पुढें असेंच कर. नंतर वेगळाले उत्पन्न झालेले भागाकार एकओळींत त्याचे त्याचे स्थळीं लिहावे, ह्मणजे अपूर्णांकाचा इच्छिला भाव झाला.*

उदाहरणें.

प्रथम, २ रुपये ३ पावलेयाचे $\frac{2}{5}$ काय आहेत. रीतीचे प्रथम रूपानें.

रु. पा.
२ . . ३
४
५)११ . . ०
रु. २ . ० . . ८० रे. हें उत्तर,

दुसरे, १ रुपयाचे $\frac{2}{3}$ काय आहेत. रीतीचे दुसरे रूपानें.

$\frac{2}{3}$
४
३)८
२ . २
१००
३)२००
६६ $\frac{2}{3}$

उत्तर. पा. २ . . रे. ६६ $\frac{2}{3}$

तिसरें, १ रुपयाचे $\frac{3}{8}$ हे पूर्णांक. किती भावाचे आहेत तें सांग.

उत्तर. रु. ० पा. १ . . रे. ५० [illegible]

चवथें. १ रुपयाचे [illegible] हे पूर्णांकांत किती भावाचे आहेत तें सांग.

उत्तर. रु. ० पा. ० . . रे. ८८ [illegible]

पांचवें. ५ रुपयांचे $\frac{3}{4}$ हे पूर्णांकांत किती भावाचे आहेत तें सांग.

उत्तर, रु. ३ . . पा. ३ . . रे. ०

साहावें. २ रुपये ३ पावले ५० रे[illegible] यांचे $\frac{3}{5}$ हे पूर्णांकांत किती भावाचे आहेत तें सांग.

उत्तर, रु. १ . पा. ० . . रे. ६[illegible]

सातवें, १ मणाचे $\frac{4}{5}$ हे वजनी पूर्णांकांत किती भावाचे आहेत तें सांग.

उत्तर. ३२ शेर.

आठवें. १ खंडीचे $\frac{3}{16}$ हे केल्ली पूर्णांकांत किती भावाचे आहेत तें सांग.

उत्तर, म. ६ पा. [illegible]

नववें. १ बिघ्याचे $\frac{7}{8}$ हे पूर्णांकांत किती भावाचे आहेत तें सांग.

उत्तर, पां. १७ का. १०

---

* [illegible] गतेंही अपूर्णांकाचा अंश भागाकाराचे शेषासारिखा कल्पिला आहे. आणि छेद भाजकासारिखा याजकरितां ह्या रीतीं आणि विधि भागाकार हीं एक जातीचीं आहेत. अ[illegible] [illegible] अपूर्णांकांतील शेषाचा भाव काढायाचे रीतीचे [illegible] आहेत.

दाहावें. १ दिवसाचे $\frac{३}{१०}$ हे विलायती मानाचे पूर्णांकांत किती मापाचे आहेत ते सांग.

अवर. मि.
उत्तर. ७ १२

नववा प्रकार.

अपूर्णांकास एक जातींतून दुसरे जातींत आणावयाचा.

* हलक्या रूपाचे अवयव त्याचे वरचे भारी रूपाचे एकांत किती आहेत तो विचार करावा; नंतर जर भारी रूपांतून हलक्या रूपांत आणावयाचें आहे तर अंशास त्या संख्येनें गुणावा. परंतु जर हलक्या रूपांतून भारी रूपांत न्यावयाचें आहे तर छेदास त्या संख्येनें गुणावा.

उदाहरणें.

प्रथम. एक रुपयाचे $\frac{३}{८}$ यांस रेसांत अपूर्णांक रूप दे.

$\frac{३}{८} + \frac{४}{१} + \frac{१००}{१} = \frac{१२००}{८}$ . . . . हें उत्तर.

दुसरें. एक रेसाचे $\frac{३}{५}$ यांस रुपयांत अपूर्णांक रूप दे.

$\frac{३}{५} + \frac{१}{१००} + \frac{१}{४} = \frac{३}{२०००}$ . . . . . हें उत्तर.

तिसरें. एक रुपयाचे $\frac{१}{१५}$ यांस रेसांत अपूर्णांक रूप दे.

उत्तर $\frac{८०}{३}$ रेस.

चवथें. वजनी एक मणाचे $\frac{१}{५}$ यांस खंडींत अपूर्णांक रूप दे.

उत्तर, $\frac{१}{१००}$ खंडी.

पांचवें, वजनी एक खंडीचे $\frac{२}{३}$ यांस शेरांत अपूर्णांक रूप दे.

उत्तर. $\frac{१६००}{३}$ शेर.

साहावें, केळी एक शेराचे $\frac{१}{२}$ यांस खंडींत अपूर्णांक रूप दे.

उत्तर, $\frac{१}{१६००}$ खंडी.

सातवें. एक रेसाचे $\frac{१}{८}$ यांस रुपयांत अपूर्णांक रूप दे.

उत्तर. $\frac{१}{३२००}$ रुपया

आठवें एक रुपयाचे $\frac{५}{६}$ यांस रेसांत अपूर्णांक रूप दे.

उत्तर, $\frac{१०००}{३}$ रेस.

नववें. १ पावला ५० रेस यांस रुपयांत अपूर्णांक रूप दे.

उत्तर, $\frac{३}{८}$ रुपया.

---

* अंकास रूपभेद करायासाठी पूर्णांकांत चढती उतरती मांडणी शान सांगितली आहे, ती आणि हीरीति, सारख्या आहेत.

दाहावें, ३ पावले ३३ रेस यांस अपूर्णांकरूपदे.

उत्तर, $\frac{३३३}{४००}$ रूप.

व्यवहारी अपूर्णांकाची मिळवणी.

जर अपूर्णांक समछेद आहेत, तर सर्व अंश एकत्र मिळवून त्याचेरवा लीं समछेद लिहि, ह्मणजे ही वेगळाले अपूर्णांकांची इच्छिली बेरीज झाली.
∗ जर अपूर्णांक समछेद नाहींत तरते समछेद करावे, आणि प्रभाग जाति अपूर्णांक, भागजाति करावे आणि अनेकरूप अपूर्णांक असती ल तर ते एकरूप करावे. नंतर वर सांगितल्याप्रमाणें मिळवणी करावी. भागानुबंध पूर्णांक असल्यास विषम अपूर्णांक रूपदेऊन काम करावें, अथवा त्यांतील अपूर्णांक मात्र घेऊन मिळवणी करावी. नंतर ती बेरी-ज पूर्णांक जोडून लिहावी.

∗ अपूर्णांक समछेद केल्याचे पूर्वी पराकाष्ठा विरूप आहेत. जसें रुपया आणि रेस हे, विरूप किंवा विजाति म्हणून त्याचा एकी भाव होत नाहिं. परंतु त्यांस जे व्हां समछेद केले आणि एकत्र वस्तूचे अवयव झाले तेव्हां त्यांचे अंशांची बेरीज अथवा वजाबाकी सुकर प्रसिद्ध होते, जशी कोणतेही पूर्ण वस्तूंची या पासून यारीतीची सत्यता स्पष्ट आहे मिळव णी अथवा वजाबाकी यांत. जेव्हां कितीएक अपूर्णांकांची मिळवणी करायाची आहे ते व्हां बहुतकरून बरें आहे कीं. त्यांतील दोन अपूर्णांक जे समछेद करण्यास सुगम आहेत ते घेऊन त्यांस समछेद करून त्यांची बेरीज घे: नंतर ती बेरीज आणि दुसरा एक अपूर्णांक यां स समछेद करून बेरीज घे; याप्रमाणे पुढेंही.

पाहा. २. भलते कोणते ही २ अपूर्णांक घेतले, जसें. $\frac{७}{११}$ आणि $\frac{३५}{५५}$ हे बरोबर भावाचे आहेत किंवा नाहींत हें त्यांस समछेद केल्या नंतर त्यांचे अंशापासून प्रसिद्ध होतें. याजकरितां जर ३५+११, आणि ७+५५ याप्रमाणें दोन बरोबर भावाचे गुणाकार उत्पन्न होतात, तर त्यापासून बरोबर भावाचें दोन नवे अपूर्णांक उत्पन्न होतील. जसें, $\frac{३५}{५५}=\frac{७}{११}$, अथवा $\frac{३५}{७}=\frac{५५}{११}$.
तेव्हां जर बरोबर भावाचे दोन अपूर्णांक घेतले, जैसें. $\frac{७}{११}$ आणि $\frac{३५}{५५}$ तेर ३५+११ = ७+५५; या प्रत्येकांतून ७+११ हे वजा करून ही बाकी राहील. (३५−७)+११=(५५−११)+७ याजकरितां हें अपूर्णांक रूप उत्पन्न होतें $\frac{३५}{५५}-\frac{७}{११}=\frac{७}{११}$ अथवा $\frac{२८}{४४}=\frac{७}{११}$.
यारीतीनें हीं जर $\frac{७}{११}$ या अपूर्णांकाचीं पदें $\frac{३५}{५५}$ या अपूर्णांकाचें पेदांशीं अनुक्रमें मिळविलीं तरी ही त्यास बरोबर भावाचें रूप होतें. जसें. $\frac{३५+७}{५५+११}=\frac{४२}{६६}=\frac{७}{११}$.
अथवा सामान्यतः जर $\frac{अ}{ब}$ $\frac{क}{ड}$. तर त्याप्रमाणें दारवविलें जातें कीं. $\frac{अ+क}{ब+ड}=\frac{अ}{ब}=\frac{क}{ड}$.
याजकरितां जेव्हां बरोबर भावाचे दोन अपूर्णांक आहेत, तेव्हां जर त्या दोहोंचे अंशांची बेरीज आणि छेदांची बेरीज अथवा अंशांची वजाबाकी आणि छेदांची वजाबाकी या पासून जे नवे अपूर्णांक उत्पन्न होतील ते त्या पूर्व दोन अपूर्णांकांचे बरोबर भावाचे-आहेत, हे प्रतिपाद्य बहुत उपयोगी आहे असें पुढें प्रमाणदर्शनांत कळेल.

उदाहरणें.

प्रथम. $\frac{३}{५}$ आणि $\frac{४}{५}$ यांचीबेरीजकर.

आतां $\frac{३}{५} + \frac{४}{५} = \frac{७}{५} = १\frac{२}{५}$, हें उत्तर.

दुसरें, $\frac{३}{५}$ आणि $\frac{५}{६}$ यांचीबेरीजकर.

आतां $\frac{३}{५} + \frac{५}{६} = \frac{१८}{३०} + \frac{२५}{३०} = \frac{४३}{३०} = १\frac{१३}{३०}$ हें उत्तर.

तिसरें. $\frac{५}{८}$ आणि ७ $\frac{१}{२}$ आणि $\frac{३}{४}$ चा $\frac{१}{३}$ यांचीबेरीजकर.

आतां $\frac{५}{८} + ७\frac{१}{२} + \frac{३}{४}$ चा $\frac{१}{३} = \frac{५}{८} + \frac{१५}{२} + \frac{१}{४} = \frac{५}{८} + \frac{६०}{८} + \frac{२}{८} = \frac{६७}{८} =$

हें उत्तर.

चवथें. $\frac{३}{७}$ आणि $\frac{६}{७}$ यांचीबेरीजकायहोते.

उत्तर. १ $\frac{२}{७}$

पांचवें. $\frac{७}{९}$ आणि $\frac{५}{६}$ यांचीबेरीजकायहोते.

उत्तर. १ $\frac{११}{१८}$

सहावें. $\frac{३}{७}$ आणि $\frac{५}{१४}$ यांचीबेरीजकायहोते.

उत्तर. [illegible]

सातवें. [illegible] आणि [illegible] आणि [illegible] यांचीबेरीज कायहोते.

उत्तर. १ $\frac{१०३}{१०५}$

आठवें. [illegible] आणि [illegible] आणि २ $\frac{१}{२}$ यांचीबेरीज कायहोते.

उत्तर. ३ [illegible]

नववें. [illegible] आणि [illegible] चे [illegible] आणि [illegible] यांचीबेरीजकायहोते.

उत्तर. १० [illegible]

दाहावें. एकरुपयाचे [illegible] आणि एकपावल्याचे [illegible] यांचीबेरीज कायहोते.

उत्तर. [illegible]

अकरावें. एकपावल्याचे [illegible] आणि एकरसाचे [illegible] यांचीबेरीज-कायहोते.

उत्तर. [illegible]

बारावें, एकरुपयाचे [illegible] आणिएकपावल्याचे [illegible] आणि एकर-साचे [illegible] यांचीबेरीज कायहोते.

उत्तर. [illegible]

व्यवहारी अपूर्णांकाची वजाबाकी.

जसें मिळवणी करावयाकरितां व्यवहारी अपूर्णांक समजाति समछेद केले, तसे तयार करावे; नंतर भारी अंशांत थोडे अंश वजा करून, बाकी राहील त्याखालीं समछेद लिहावे. म्हणजे इच्छिली वजाबाकी झाली.

उदाहरणें.

प्रथम, $\frac{५}{६}$ आणि $\frac{१}{६}$ यांची वजाबाकी कर.

आतां $\frac{५}{६} - \frac{१}{६} = \frac{४}{६} = \frac{२}{३}$ .... हें उत्तर.

दुसरें. $\frac{३}{४}$ आणि $\frac{५}{९}$ यांची वजाबाकी कर.

$\frac{३}{४} - \frac{५}{९} = \frac{२७}{३६} - \frac{२०}{३६} = \frac{७}{३६}$ .. हें उत्तर,

तिसरें, $\frac{७}{१२}$ आणि $\frac{५}{१२}$ यांची वजाबाकी कर.

उत्तर, $\frac{१}{६}$

चवथें. $\frac{७}{१३}$ आणि $\frac{५}{३९}$ यांची वजाबाकी कर.

उत्तर, $\frac{५}{३९}$

पांचवें, $\frac{५}{१२}$ आणि $\frac{३}{१३}$ यांची वजाबाकी कर.

उत्तर. $\frac{२९}{१५६}$

साहावें, ५ $\frac{३}{८}$ आणि ४ $\frac{१}{६}$ चे $\frac{२}{७}$ यांची वजाबाकी कर.

उत्तर. ४ $\frac{३१}{१६८}$

सातवें, एक रुपयाचे $\frac{५}{६}$ आणि एक पावल्याचे $\frac{३}{८}$ चे $\frac{३}{५}$ यांची वजाबाकी कर.

पा. रे.

उत्तर. १ .. ७२ $\frac{३}{४}$

आठवें, रुपये, ५ $\frac{१}{६}$ चे $\frac{३}{७}$ आणि एक पावल्याचे $\frac{३}{८}$ यांची वजाबाकी कर.

रु. पा. रे.

उत्तर. १ .. १ .. ३० $\frac{२०}{४२}$

व्यवहारी अपूर्णांकाचा गुणाकार.

* भागानुबंध पूर्णांक असलातर त्यास विषम अपूर्णांकाचें रूप द्यावें;

* कोणतीही वस्तु अपूर्णांकानें गुणायाची, यांत हाच अर्थ आहे की, त्या वस्तूचे कांहीं भाग घ्यावयाचे आहेत. याजकरितां प्रभाग जाति अपूर्णांकासारिखें प्रसिद्ध होतें; आणि त्याप्रमाणें अंश आणि छेद परस्पर अनुक्रमें गुणून नवा इच्छिला अपूर्णांक उत्पन्न होतो.
पाहा. जेव्हां अपूर्णांकास पूर्णांकानें गुणायाचें आहे तेव्हां त्या अपूर्णांकाचे छेद त्या पूर्णांकानें निःशेष भागिले जातील तर भागून भागाकार तेथेंच लिहावा म्हणजे इच्छिलें काम झालें. आणि तसें न होईल तर अंश पूर्णांकानें गुणावे म्हणजे इच्छिलें काम झालें.

नंतर सर्व अंश परस्पर गुणावे, ते अंश होतील, तसे सर्व छेद परस्पर गुणावे, ते छेद होतील, म्हणजे इच्छिला गुणाकार होईल.

उदाहरणें.

प्रथम, $\frac{३}{४}$ आणि $\frac{२}{५}$ यांचा गुणाकार काय होतो.

आतां, $\frac{३}{४}+\frac{२}{५}=\frac{६}{२०}=\frac{३}{१०}$ हें उत्तर.

दुसरें, $\frac{३}{५}$, २ $\frac{१}{६}$, ५ आणि $\frac{३}{८}$ चे $\frac{२}{३}$ हे सर्व परस्पर गुण.

आतां, $\frac{३}{५}+\frac{१३}{६}+\frac{५}{१}+\frac{३}{८}+\frac{२}{३} = \frac{१३+२}{८+२} = \frac{३१}{६} = ५\frac{१}{६}$ हें उत्तर.

तिसरें, $\frac{३}{७}$ आणि $\frac{५}{८}$ यांचा गुणाकार काय होतो.

उत्तर, $\frac{५}{२८}$

चवथें, $\frac{४}{१५}$ यांस $\frac{५}{२४}$ यांनीं गुण.

उत्तर. $\frac{१}{१८}$

पांचवें, $\frac{३}{७}$, $\frac{४}{९}$ आणि $\frac{३}{८}$ हे सर्व परस्पर गुण.

उत्तर, $\frac{६}{७}$

साहावें, $\frac{२}{३}$, $\frac{३}{२}$ आणि ३ हे सर्व परस्पर गुण.

उत्तर. १.

सातवें, $\frac{३}{४}$, $\frac{२}{५}$ आणि ४ $\frac{३}{१०}$ हे सर्व परस्पर गुण.

उत्तर. २ $\frac{३}{१०}$.

आठवें, $\frac{४}{७}$ आणि $\frac{५}{७}$ चे $\frac{२}{३}$ हे परस्पर गुण.

उत्तर. $\frac{१०}{२१}$

नववें, ८ आणि ५ चे $\frac{२}{३}$ हे परस्पर गुण.

उत्तर. २०.

दाहावें, $\frac{३}{८}$ चे $\frac{१}{२}$ आणि $\frac{३}{७}$ चे $\frac{७}{८}$ हे परस्पर गुण.

उत्तर. $\frac{२३}{८४}$.

अकरावें ३ $\frac{२}{७}$ आणि ४ $\frac{१४}{३३}$ हे परस्पर गुण.

उत्तर, १४ $\frac{१२९}{२३१}$

बारावें. ५ $\frac{२}{३}$, $\frac{३}{८}$ चे $\frac{२}{३}$ आणि ४ $\frac{३}{७}$ हे सर्व परस्पर गुण.

उत्तर. २ $\frac{३}{३१}$.

व्यवहारी अपूर्णांकाचा भागाकार.

---

* जसे गुणाकार करावयास अपूर्णांक तयार केले, तसेच भागाकार करावयास तयार करावे; नंतर अंश अंशानीं भागावे, तसे छेद छेदाने भागावे. जर दोनही निःशेष भागले जातील. असें न होईल तर भाजकाचे अंश व छेद बदलून लिहून गुणाकाराशीं प्रमाणें तीं पदें परस्पर गुणावीं, म्हणजे भागाकार झाला.

उदाहरणें.

प्रथम, $\frac{२५}{९}$ यांस $\frac{५}{३}$ यानें भाग.

आतां. $\frac{२५}{९} \div \frac{५}{३} = \frac{५}{३} = १\frac{२}{३}$ हें उत्तर.

दुसरें, $\frac{५}{२}$ यांस $\frac{३}{५}$ याने भाग.

$\frac{५}{२} \div \frac{३}{५} = \frac{५}{२} \times \frac{५}{३} = \frac{२५}{६} = ४\frac{१}{६}$ हें उत्तर.

तिसरें. $\frac{१६}{२५}$ यास $\frac{४}{५}$ याने भाग.

उत्तर, $\frac{४}{५}$.

चवथें. $\frac{७}{१६}$ यास $\frac{३}{४}$ याने भाग.

उत्तर, $\frac{७}{१२}$.

पांचवें, $\frac{१४}{९}$ यास $\frac{७}{६}$ याने भाग.

उत्तर, $१\frac{१}{३}$.

साहावें, $\frac{५}{६}$ यास $\frac{१५}{७}$ याने भाग.

उत्तर, $\frac{७}{१८}$

सातवें, $\frac{१२}{३५}$ यास $\frac{३}{५}$ याने भाग.

उत्तर, $\frac{४}{७}$

आठवें, $\frac{२}{३}$ यास $\frac{७}{५}$ याने भाग.

उत्तर, $\frac{१०}{२१}$

नववें. $\frac{३}{८}$ यास २ याने भाग

उत्तर, $\frac{३}{१६}$

दाहावें. $\frac{३}{५}$ यास २ याने भाग

उत्तर, $\frac{३}{१०}$

---

* भागाकार गुणाकाराचे उलटा आहे, याजकरितां या रीतीची सत्यता स्पष्ट आहे.

पाहा, जेव्हां अपूर्णांकास पूर्णांकाने भागायाचे आहे, तेव्हां त्या अपूर्णांकाचे अंश पूर्णांकानें निःशेष भागिले जातील तर भागून, भागाकार तेथें लिहावा. तसें न होईल तर छेद पूर्णांकाने गुणावे म्हणजे इच्छिलें झालें.

अकरावें. ७ $\frac{१}{३}$ यास ० $\frac{५}{८}$ यानें भाग.

उत्तर

बारावें, $\frac{१}{३}$ चे $\frac{३}{४}$ यास ७ $\frac{३}{८}$ चे $\frac{५}{६}$ यानें भाग.

उत्तर, $\frac{७}{१७१}$

व्यवहारी अपूर्णांकाचें त्रैराशिक.

पूर्वरीती प्रमाणें अपूर्णांक तयार करावे; नंतर त्यांत सम आणि व्यस्त काय असेल तें पाहून त्रिराशी रीती प्रमाणें इच्छाफळ उत्पन्न करावें.

उदाहरणें.

प्रथम, जर एक यार्ड बनातीचे $\frac{३}{८}$ यांस एक रुपयाचे $\frac{३}{५}$ पडतात; तर एक यार्ड बनातीचे $\frac{५}{१६}$ यांस काय पडेल ?

जर या. रु. या.

$\frac{३}{८}$: $\frac{३}{५}$ :: $\frac{५}{१६}$

रु. पा. रे.

$\frac{८}{३}$ + $\frac{५}{१६}$ + $\frac{३}{५}$ = $\frac{१}{२}$ = १ :: ३२ $\frac{१}{२}$ इच्छाफळ हें उत्तर.

दुसरें, जर रुपें तोळे ३ $\frac{३}{८}$ यास ४ रुपये २ पावले पडतात; तर १ तोळ्यास काय पडेल ?

रु. पा. रे.

उत्तर. १ .. १ .. ३३ $\frac{१}{३}$.

तिसरें, जर १ गलबताचे $\frac{३}{१६}$ यांची किंमत २७ ३१ रु. १ पावला होते, तर त्या गलबताचे $\frac{५}{३२}$ याची किंमत किती होईल ?

रु. पा. रे.

उत्तर, २२७६ .. ० .. १६ $\frac{२}{३}$.

चवथें. कलकत्यास १०० रुपयांची हुंडी घेणें तर, मुंबईस १०८ $\frac{३}{८}$ रुपये पडतात, तर कलकत्यास १२३०० रुपयांचे हुंडीस मुंबईस किती रुपये देणें पडतील.

रु. पा. रे.

उत्तर, १३३६८ .. ३ .. ५०

पांचवें. २१२७ रुपये २ पावले याचें एक वर्षाचें व्याज दरशेंकडा ३ $\frac{३}{८}$ रुपये प्रमाणें काय होईल ?

रु. पा. रे.

उत्तर, ८८ .. ३ .. ८७ $\frac{१}{२}$

साहावें. एक गलबताचा $\frac{३}{८}$ यास ७३० रुपये २ पावले २५ रेस पडतात. तर २५०० रुपयांस त्याच गलबताचा कोणता हिस्सा येईल ?

उत्तर, $\frac{५०००}{११६८९}$

सातवें. एक फूट अथवा १२ अंगुळें लांब आणि १२ अंगुळें रुंद असें फळें असावें. त्यास ७ $\frac{३}{४}$ अंगुळें रुंदीचा तखता लांब आहे. तेव्हां त्यांतून कितीलांब घेतल्यानें बरोबर होईल. ?

उत्तर. १८ $\frac{१८}{३१}$ अंगुळें.

आठवें. ८ $\frac{१}{२}$ यार्ड लांब आणि २ $\frac{१}{२}$ यार्ड रुंद कापडाची रजई करावयाची आहे, तीस एक भागास रेशमी अस्तर असावें, आणि तें रेशमी एकया डौंचें $\frac{२}{३}$ रुंदीचें आहे. तेव्हां कितीलांब घ्यावें म्हणजे रजईस बराबर होईल.

उत्तर. ३१ $\frac{७}{८}$ यार्ड.

नववें, कोणी एक जासूद रोज १३ $\frac{५}{६}$ तास चालत असतां, ३९ $\frac{१}{२}$ दिवसांत ज्या मुकामी गेला; त्याच मुक्कामीं जाणें आहे आणि रोज ११ $\frac{९}{१०}$ तास चालतो आहे, तर किती दिवस लागतील ?

उत्तर. ४५ $\frac{६५५}{७१४}$ दिवस.

दाहावें, एक पलटणांत ९७६ शिपाई आहेत. त्यांस नवीं डगलीं घावयाचीं. एक डगल्यास बनात ७ $\frac{१}{२}$ यार्ड लांब आणि १ $\frac{५}{६}$ यार्डांचे रुंदीचें लांब आहे, तेव्हां कितीयार्ड लांब घेतलें म्हणजे सर्व डगल्यांस पुरेल.

उत्तर. ४५३१ $\frac{३}{४}$ यार्ड.

दशांश अपूर्णांक.

दशांश अपूर्णांक तोच आहे. ज्याचा छेद (१०) हा अंक आहे: आणि त्याजवर इतकीं शून्यें आहेत कीं अंशस्थळींचे अंकास जितकीं स्थळें आहेत; आणि त्याचे लिहिण्याचा प्रकार असा आहे कीं. अंशस्थळींचा अंक लिहून त्याचे डावेकडे मात्र (.) असा बिंदु द्यावा. जसें $\frac{४}{१०}$ ह्मणजे या प्रमाणें लिहितात. .४. आणि $\frac{२४}{१००}$ या प्रमाणें लिहितात; .२४ आणि $\frac{७५}{१०००}$ या प्रमाणें; .०७५ आणि $\frac{१२४}{१००००००}$ याप्रमाणें .०००१२४ ! यांत इतकीं शून्यें घालितात कीं, अंकस्थळाचीं संख्या तीहींकरून छेदस्थळींचे शून्याचे संख्ये बराबर होईल.

मिश्र संख्या तीच आहे: जींत एक पूर्णांक संख्या आणि दुसरी अपूर्णांक संख्या योजिली आहे. त्यांना भेद मधील बिंदु करून स्पष्ट होतो. जसें. ३.०५ हा आणि ३ $\frac{५}{१००}$ अथवा $\frac{३०५}{१००}$ ही एकच आहे.

दशांशाचे उजवे बाजूस कितीही शून्यें ठेविलीं तरी त्यांचे भावांत-

न्यूनाधिक होत नाहीं; म्हणजे .४ अथवा .४० अथवा .४०० हे दशांश आहेत ज्यांचे भाव एकच आहेत. यांचे बरोबर ४/१० = २/५. परंतु जे कां दशांशाचे डावेकडे शून्यें ठेविलीं, तेव्हां त्यांचे भाव उत्तरोत्तर दशगुण न्यून होतात; जसें: .४ हा ४/१० म्हणजे चार दशमांश आहेत; परंतु .०४ हा ४/१०० म्हणजे चार शतांशाचे भाव बरोबर आहे; आणि .००४ हा ४/१००० म्हणजे चार सहस्रांशांचे बरोबर आहे.

जेव्हां दशांशांत कितीएक अंक लिहून पुढें संख्या स्तब्ध होते त्यांस सांत दशांश म्हणतात, जसें .१२५ १२५/१००० = १/८ आणि .९४८ = ९४८/१००० = २३७/२५०.

जेव्हां दशांशांत एक किंवा अनेक अंक त्यांचे तेच पुनः पुनः येतात तेव्हां त्यांस आवर्त दशांश ह्मणतात; जसें, .३३३३३३ इत्यादि = १/३, .६६६६६६ इत्यादि = २/३, .४२८५७१४२८५७१ इत्यादि तसेंच बहुत दुसरेही

जसें पूर्णांकांत तसेंच दशांश अपूर्णांकांत आहे कीं, उजवेकडील अंकाहून डावेकडील अंक उत्तरोत्तर दशगुण अधिक होतो आणि उजवेकडे तसाच न्यून होतो हें यापुढील कोष्टकावरून समजण्यांत येईल.

दशलक्ष.	लक्ष.	दशसहस्र.	सहस्र.	शत.	दश.	एक.	दशांश.	शतांश.	सहस्रांश.	दशसहस्रांश.	लक्षांश.	दशलक्षांश.
१	१	१	१	१	१	१	१	१	१	१	१	१

दशांश अपूर्णांकाची मिळवणी.

अपूर्णांकां प्रमाणें यांतील अंक त्या त्या भावानें अंकाखालीं अनुक्रमें लिहावे. असें केल्यानें ज्या दशांश चिन्हबिंदूनीं पूर्णांक आणि अपूर्णांक यांचा भेद दाखविला ते सर्व एकाखालीं एक असे एका ओळींत येतील. नंतर पूर्णांक रीतीनें उजवेकडून आरंभ करून एक एक ओळीची बेरीज घेऊन लिहावी; आणि ज्या रकमेंत दशांश स्थळें अधीक असतील तीं मोजून बेरिजेंत तितक्या स्थळांवर अथवा दशांश चिन्हाचे ओळीखालीं

दशांश चिन्ह करावें.

उदाहरणें.

प्रथम, २९·०१४६ आणि ३१४६·५ आणि २१०० आणि ·६२४१७ आणि १४·१६ यांची बेरीज घे.

```
   २९·०१४६
 ३१४६·५
 २१०९.
      ·६२४१७
   १४·१६
_______________
 ५२९९·२९८७७  ही बेरीज.
```

दुसरें, २७६, ३९·२१३, ७२०१४·९, ४१७ आणि ५०३२ यांची बेरीज घे.

उत्तर, ७७७७९ ११३.

तिसरें, ७५३०, १६·२०१, ३·०१४२, ९५७·१३, ६·७२११९ आणि ·३०१४ यांची बेरीज घे.

उत्तर, ८५१३·० ९६५३.

चवथें, ३१२·०९, ३·५७११, ७१९५·६, ७१·४९८, ९७३९·२१५, १७९ आणि ·००२७ यांची बेरीज घे.

उत्तर. १७५००·९७६८

दशांश अपूर्णांकांची वजाबाकी.

मिळवणी प्रमाणें, सर्व अंकांस आप आपले भावारवालीं लिहावे; नंतर पूर्णांक रीती प्रमाणें, उजवेकडून आरंभ कर, नंतर मिळवणींत सांगितल्या प्रमाणे दशांशचिन्ह बिंदू करावा.

उदाहरणें.

प्रथम. ९१·७३ आणि २·१३८ यांची वजाबाकी कर.

```
  ९१·७३
   २·१३८
_____________
  ८९· ५९२  बाकी हें उत्तर.
```

दुसरें, १· ९१८५ आणि २·७३ यांची वजाबाकी कर. उत्तर, ८·११

तिसरें, ४·९०१४२ आणि २१४·८१ यांची वजाबाकी कर. उत्तर, २०९·९

चवथें, २७१४ आणि ·९१६ यांची वजाबाकी कर. उत्तर, २७१३·०८

दशांश अपूर्णांकाचा गुणाकार.

∗ जसें अपूर्णांक असतात, तसें कर्त्यांस मांडून गुणाकार करावा;—नंतर दोहों कर्त्यांत जितकीं दशांश स्थळें आहेत तितकीं गुणाकारांत मोजून दशांश चिन्ह करावें. परंतु जर गुणाकारांत इतकीं अंकस्थळें नाहीं तर मागें शून्यें देऊन तितकीं स्थळें पूर्ण करून दशांश चिन्ह करावें.

उदाहरणें.

प्रथम. ·३२१०९६ यांस ·२४६५ यांनीं गूण.

```
     ·३२१०९६
       ·२४६५
   ----------
     १६०५४८०
    १९२६५७६
   १२८४३८४
   ६४२१९२
  -----------
  ·०७९१५०१६४०   गुणाकार हें उत्तर.
```

दुसरें. ७९·३८७ यांस २३·१५ यांनीं गूण. उत्तर, १८३६·८०३०५.

तिसरें. ·६३४७८ यांस ·४२०४ यांनीं गूण. उत्तर, ·२६६८६१५१२.

चवथें ·३८५७४६ यांस ·००४६४ यांनीं गूण.

उत्तर, ·००१७८९८६१४४.

प्रथमसंक्षेप.

दशांशास १ आणि त्यावर १, दोन, किंवा याहून अधिक शून्यें. जसें १०, १००, १००० इत्यादिकानें गुणायाचें.

हें काम करायास इतकें मात्र केलें पाहिजे, गुणकांत जितकीं शून्यें आहेत तितक्यां स्थळांवर गुण्यांत उजवेकडे दशांश चिन्ह सारावें, तितकीं स्थळें नाहींत तर शून्यें देऊन पूर्ण करावीं.

उदाहरणें.

प्रथम, ५१·२ आणि १००० यांचा गुणाकार हाच आहे, ५१२००.

दुसरें, २·७१४ आणि १०० यांचा गुणाकार काय आहे ?

तिसरें, ·९१६ आणि १००० यांचा गुणाकार काय आहे ?

∗ या पुढील उदाहरणापासून या रीतीची सत्यता स्पष्ट होईल — ·१२ हें ·३६१ यांनीं गुणायाचें असावें. या संख्या यांचे बरोबर आहेत $\frac{१२}{१००}$ आणि $\frac{३६१}{१०००}$ यांचा गुणाकार हाच आहे. $\frac{४३३२}{१०००००}$ म्हणजे पूर्वीं सांगितले दशांश अपूर्णांक लिहिण्याचे रीती प्रमाणें ·०४३३२ आहे: ज्यांत दशांश स्थळें छेदस्थळींचे शून्या इतकीं आहेत अथवा दोहों कर्त्यांत जितकीं दशांश स्थळें आहेत.

चवथें. २१·२१ आणि १०००० यांचा गुणाकार काय आहे

दुसरासंक्षेप.

संक्षेपानें गुणाकार कृति करायाचा. असाकीं. गुणाकारांत दशांशस्थळें इच्छिल्या प्रमाणेंच येतील.

गुणक संख्येंतील एकंचेस्थळींचा अंक गुण्यां कांचे त्या अंकाखालीं लिहावा; जो अंक गुणाकारांतील इच्छिले दशांशस्थळांचे शेवटलेस्थळीं आहे; आणि तेथून बाकी पूर्णांक उजवेकडे उलटे लिहावे, आणि अपूर्णांक त्या एकंपासून डावेकडे लिहावे. नंतर गुणायास आरंभ करावा, ज्या गुणकानें गुणायाचें त्याचे वरचे अंकापासून होईल असा; परंतु उजवे कडील शेवटा पासून लिहावें; मागील सोडिले अंकांतून एक जवळचा अंक गुणून त्यांतून हातचे घेण्याचा मार्ग ५ पासून १४ पर्यंत असल्यास हातचा एक धरावा; तसें १५ पासून २४ पर्यंत हातचे २, तसें २५ पासून ३४ पर्यंत असल्यास हातचे ३, याप्रमाणें पुढेंही. तो हातचा अंक त्यांत मिळवून लिहावें; नंतर पूर्वप्रमाणें मिळवणी करून तितकें इच्छिले स्थळांवर दशांश चिन्ह करावें, ह्मणजे गुणाकार झाला.

उदाहरणें.

प्रथम. २७·१४९९८६ यांस. ९२·४१०३५ यांनीं गूण, असें कीं. गुणाकारांत दशांशस्थळें चार होतील.

संक्षेपरीति.

२७१४९९८६
५३०१४२९
२४४३४८९७४
५४२९९७
१०८५९९
२७१५
८१
१४
२५०८·९३८०

चालतीरीति.

२	७·१४९९८६
९	२·४१०३५
११	५७४०३०
८१	४४९०५८
२७१४	९८६०
१०८५९९	४४
५४२९९७	२
२४४३४८९७४	
२५०८९३८०	५५०५१०

दुसरें, ४८०·१४९३६ यांस २·७२४१६ यांनीं गूण, असें कीं, गुणाकारांत दशांशस्थळें चार होतील.

गुणाकार, १३०८·००३६.

तिसरें, २४९०·३०४८ यांस ·५७३२०६ यांनीं गूण, असें कीं, गुणाकारांत दशांशस्थळें पांच होतील.

गुणाकार. १४२७·६५६०७.

चवथें, ३२५·७०१४२८ यांस ·७२१८३९३ यानीं गूण, असे कीं, गुणाकारांत दशांशस्थळें तीन होतील.

गुणाकार, २३५·१०४.

दशांशअपूर्णांकाचा भागाकार.

पूर्णांका प्रमाणें, भागाकार करावा; आणि भागाकारांत इतकीं दशांशस्थळें करावीं कीं, जितकीं, दशांशस्थळें भाजका पेक्षां भाज्यांत अधीक आहेत. ⁂

दशांशचिन्ह बिंदुस्थळ जाणायाची दुसरी हीरीती आहे; भागाकारांतील प्रथम अंक, पूर्णांक अथवा दशांश असेल तो अशास्थळीं असावा कीं, भाजक आणि भागाकार यांचे प्रथम गुणाकारांतील भाजकांचे एकंचे स्थळींचा गुणला अंक जशा स्थळीचे भाज्यांका खालीं बसेल. तशास्थळीं.

जेव्हां रीती प्रमाणें दशांशचिन्ह बिंदुस्थळ करायाचें आणि भागाकारांत. तेवढीं स्थळें नाहींत तर शून्यानीं तेवढीं स्थळें करून बिंदु करावा.

जेव्हां भागाकार केल्यानंतर कांहीं शेष राहील अथवा जेव्हां दशांशस्थळें भाज्या पेक्षां भाजकांत अधिक आहेत; तेव्हां भाज्यावर तितकीं शून्यें घालावीं कीं, काम इच्छे प्रमाणें होईल.

उदाहरणें.

प्रथम,	दुसरें,
१७८) ४८५२०९९८(००२७२५८९	·२८३९) २७·०००००(९०२·३११४
१२९२	६१००
४६०	८२२०
१०४९	३०३०
१५९९	३९१०
१७५८	१२७१४
१५६	२१५४

तिसरें, १२२·७०५३६ यांस ५४·२५ यानीं भाग. उत्तर, २·२६०२

चवथें, १२ यांस ·७८५४ यानीं भाग. उत्तर, १५·२७८.

पांचवें, ४११५·६८ यांस १०० यानीं भाग. उत्तर, ४१·१५६८.

⁂ यारीतीचें कारण स्पष्ट आहे; कांकीं, भाजक आणि भागाकार हे गुणून भाज्य उत्पन्न होतो. आणि गुणाकारा प्रमाणे भाज्यांत दशांशस्थळें भाजक आणि भागाकार यादोहोंतील दशांशस्थळांचे बरोबर असलीं पाहिजेत याजकारितां भागाकारांत तितकीं दशांश स्थळें असलीं पाहिजेत. जितकीं भाजका पेक्षां भाज्यांत अधिक आहेत.

साहावें, ·८२०७५०२ यांस. १५३ यानीं भाग. उत्तर, ५·४२३३

प्रथमसंक्षेप.

जेव्हां भाजक पूर्णांक आहे, आणि त्यावर कांहीं शून्यें असतील; तेव्हां त्या शून्यास काढून टाकावें, आणि दशांश चिन्ह भाज्यांत इतके स्थळांवर मागें डावेकडे सारावें, कीं, जितकीं शून्यें कापून टाकिलीं आहेत. जर भाज्यांत तितकीं स्थळें नाहींत तर डावेकडे शून्यें घालून, पूर्ण करून, सारावें नंतर वर सांगितले रीतीनें भागाकार करावा.

उदाहरणें.

प्रथम, ४५·५ यांस २१०० यानीं भाग.

२१)·४५५(·०२१६ इत्यादि.
३५
१४०
१४

दुसरें, ४१०२० यांस ३२००० यानीं भाग. उत्तर, १·२८१८७५.

तिसरें, ९५३ यांस २१६०० यानीं भाग.

उत्तर, ·०४४१२०३७०३७ इत्यादि.

चवथें, ६१ यांस ७९००० यानीं भाग.

उत्तर, ·०००७७२१५१९ इत्यादि.

दुसरासंक्षेप.

वरचे संक्षेपापासून हें सिद्ध होतें कीं, जर भाजक १ हा अंक असेल, आणि त्याजवर कांहीं शून्यें असतील, जसें, १०, १००, १०००, इत्यादि, तर भागाकार काढण्या साठीं भाज्यांतील दशांश चिन्ह इतकें मात्र मागें सारिलें पाहिजे कीं, जितकीं भाजकांत शून्यें आहेत; जर इतकीं अंकस्थळें नसतील तर मागें शून्यें घालून स्थळें पूर्ण करून सारावें.

उदाहरणें.

जसें, २१७·३÷१००=२·१७३

आणि, ५·१६÷१००=·०५१६

आणि, ४१९÷१०=४१·९

आणि, ·२१÷१०००=·

तिसरासंक्षेप.

जेव्हां भाजकांत अंक बहुत आहेत; अथवा भागाकारांत दशांश

स्थळें इच्छेप्रमाणेंच यावीं असें आहे; तेव्हां भागाकारांत पूर्णांक स्थळें किती येतील तो सुमार करून तीं व इच्छिलेलीं दशांश स्थळें मिळून कितीस्थळें होतात तितकीं भाजक स्थळें ठेवून बाकी कापून टाकावीं. नंतर तो भाजक भाज्याचे प्रथम अंकांत किती वेळ जाईल तें पूर्वप्रमाणें पाहावें.

नंतर अनुक्रमें प्रत्येक वजाबाकी नवे भाज्य असावे; आणि असा प्रत्येक भाज्य घेतल्यावर भाजक स्थळींचा एक एक उजवेकडील अंक सोडावा, परंतु स्मरण ठेवावें कीं, असा एकेक अंक सोडिल्यावर हातचा अंक गुणाकाराचे दुसरे संक्षेपांत सांगितल्या प्रमाणें घेतला पाहिजे; पाहा जेव्हां भाजकांत इतके अंक नाहींत, जितके भागाकारांत इच्छिले आहेत, तेव्हां सर्व अंकानीं भागाकार तुल्य आरंभ करावें, आणि सरळ रीतीनें भागाकार चालवावा, जों पर्यंत भाजकस्थळीं इतके अंक मात्र राहातील, जितके भागाकारांत बाकी काढणें राहिले; नंतर आरंभ करावा.

उदाहरणें.

प्रथम, २५०८·९२८०६ यांस १२·४१०३५ यानीं भाग, असें कीं, भागाकारांत दशांश स्थळें चार होतील. यावरून या उदाहरणीं भागाकारांत अंकस्थळें साहा होतील.

संक्षेपरीति.

```
१२·४१०३५)२५०८·९२८०६(२७·१४९८
          ६६०७११
           १३८४९
            ४६०८
             ९१२
              ८०
               ६
```

चालतीरीति.

```
१२·४१०३५)२५०८·९२८०६(२७·१४९८
          ६६०७२१०६
           १३८४८६१०
            ४६०७५७५०
             ९१११६१००
              ७९४६७८५०
               ५५३६५·७०
```

दुसरें, ४१०९·२२५१ यांस २२०·४०९ यांनीं भाग, असें कीं भागाकारांत दशांश स्थळें चार होतील. उत्तर, १७·८३४५.

तिसरें, ३७·१०४३८ यांस ५७१२·९६ यांनीं भाग, असे कीं, भागाकारांत दशांशस्थळें पांच होतील.

उत्तर, ·००६४९.

चवथें, ९१२·०८ यांस २१३७·२ यांनीं भाग. असें कीं, भागाकारांत दशांशस्थळें तीन होतील.

उत्तर, ·४२७.

दशांशरूपभेद
प्रथमप्रकार.

पांचवें. चैत्र शुद्ध प्रतिपदेस, १०००० रुपये भांडवल करून, ह. नें व्यापार आरंभिला; नंतर ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदेस त्या व्यापारांत १५००० रुपये भांडवल देऊन क. सर्कती मिळाला; नंतर भाद्रपद शुद्ध प्रतिपदेस त्याच व्यापारांत २०००० रुपये भांडवल देऊन, ग. सर्कती झाला; या प्रमाणें तिघांचा सर्कती व्यापार चालला; पुढें वर्षांती हिशेब करितां १७२६५ रुपये नफा झाला, तो भाग प्रमाणें तिघांस बरोबर वांटून दे.

		रु.	पा.	रें.	
उत्तर,	ह. चा वांटा.	४५७४	२	७१	११७/२६६
	क. चा वांटा.	५७१८	१	३८	२६/२६६
	ग. चा वांटा.	३४७१	३	८९	१२६/२६६

साहावें. र. ल. च. या तिघांनीं १ वर्ष सर्कतीनें व्यापार केला त्यांत आरंभीं र. नें. ३०० रुपये दिले, पुढें चार महिनें जाऊन २०० रुपये दिले; तसें ल. नें

आरंभीं ३०० रुपये दिले. पुढें ३ महिने गेल्यावर २०० रुप. दिले. नंतर दोनमहिनें गेल्यावर पुनः ४०० रुपये दिले. तसेच व नें आरंभीं ६०० रुपये दिले. पुढें ९ महिनें गेल्यावर १०० रु. दिले. नंतर १ महिना गेल्यावर १०० रु. माघारे घेतले. याप्रमाणें वर्ष पुरें झाल्यानंतर हिशेबीं ५०० रु. नफा झाला. तो तिघांस बरोबर वांटून दे.

		रु.	पा.	रे.	
उत्तर.	रच्या वांटा.	१०२	२	२५	$\frac{१२५}{१५५}$
	लच्या वांटा.	२१०	१	२	$\frac{११०}{१५५}$
	वच्या वांटा	१८७	०	७१	$\frac{१५५}{१५५}$

व्याज.

व्याज म्हणजे पैका उधार देणें किंवा घेणें याजवर वृद्धीचा नियम आहे. जो पैका उधार देतात किंवा घेतात, त्यास मुद्दल म्हणतात; आणि व्याज व मुद्दल यांचे बेरिजेस रास म्हणतात. व्याज शेंकड्याप्रमाणें वर्षावर अथवा महिन्यावर किंवा दिवसावर ठरवितात. परंतु बहुत करून वर्षावरच. त्यास व्याजाचा दर म्हणतात:-

जसें,

जेव्हां व्याज शेंकड्यास ३ आहे, तेव्हां दर ३ चा म्हणतात.
शेंकड्यास ४ आहे. - - ४ चा म्हणतात.
शेंकड्यास ५ आहे - - - ५ चा म्हणतात.
शेंकड्यास ६ आहे - - ६ चा म्हणतात.

व्याज दोन प्रकारचें आहे, सरळ आणि चक्रवाढ

सरळ व्याज तेंच आहे जें झालें मुदतीचें दराप्रमाणें मुद्दलावर मात्र व्याज होतें. कोणतेही पैक्याचें व्याज, कोणतेही वेळेंत, मुद्दल पैका आणि त्याचा काळ यांशीं समप्रमाणांत आहे, याजवरून त्यांचा हिसाब करायास ही पुढील सामान्यरीति उत्पन्न झाली आहे.

जसें १०० रुप. व्याजाचे दरास आहेत तसें कोणतेही सांगितलें मुद्दल त्याच एक नियम काळाचें व्याजास होईल. आणि पुनः

जसें एक नियम काळ. कोणतेही सांगितले काळांस आहे. तसें वर उत्पन्न झालेलें एक नियम काळाचें व्याज सांगितलें सर्व काळाचे व्याजास होईल.

अथवा, १ रुपयाचें एक नियम काळाचें व्याज घेऊन त्यानें सांगितलें मुद्दल गुणावें. आणि तो गुणाकार उधार दिलेले किंवा घेतलेले पैक्याचे नियम काळानें गुणावा. म्हणजे हा गुणाकार त्या काळाचें इच्छिलें व्याज होईल.

पाहा, जेव्हां काळामध्यें वर्षांचे कांहीं अवयव आहेत, जसें अर्धवर्ष, पाववर्ष, महिना, अथवा दिवस तेव्हां त्याचें आज वर्षांचें व्याज भागून होईल, अथवा त्रैराशीरितीनें होईल.

उदाहरणें.

प्रथम, मुद्दल रु. २३०५ याशीं व्याज दरसाल दर शेकडा रु. ४ प्रमाणें १ वर्षाचें व्याज किती रुपये होतील तें सांग.

जसें, १०० : ४ : : २३०५
४

१००) ९२२०.० (९२.२ रु.
९००
०२२०
२००
०२००
२००
०००

.२
४
.८
१००
रेस ८००

रु. पा. रे.
९२ . . ० . . ८० एक वर्षाचें व्याज हें उत्तर.

दुसरें, मुद्दल रुपये ५४७७ . . २ पावले याशीं व्याज दरसाल दर शेकडा रुपये ५ प्रमाणें ३ वर्षांचें व्याज किती रुपये होतील तें सांग.

जसें १०० : ५ : : ५४७७ . ५ :

अथवा २० : १ : : ५४७७ . ५ :

२०) ५४७७ . ५०० (२७३ . ८७५ व्याज १ वर्षाचें.
४०
१४७
१४०
००७७
६०
१७५
१६०
१५०
१४०
०१००
१००

रु. ८२१ . ६२५ तीन वर्षांचें.
४
पा २ . ५००
१००
रे. ५०.०००

रु. पा. रे.
८२१ . . २ . . ५० हें उत्तर.

तिसरें. मुद्दल रु. २१०० याशीं व्याज दरसाल दर शेकडा रु. ४½ प्रमाणें ४ वर्षें ७ मास २५ दिवस, याचें व्याज किती रुपये होतील तें सांग.

जसें. १०० : ४½ : : २१००
४½

१०५००
८४००
१००) ९४५०० (९४ . ५ एक वर्षाचें व्याज
९००
४५०
४००
५००
५००

४
रु. ३७८ . ० चार वर्षांचें.
४७ . २५ साहा मास.
७ . ८७५ एक मास.
६ . ५६२ पंचवीस दिवस

रु. ४३१. ५९७
          ४
पा. २ . ३८८
          १००
रे. ३८ . ८००

अथवा.

जसें. ३६५ : ९४.५ : : २५ :

```
              २५
          ------
           ४७२५
          १८९०
      ----------
३६५)   २३६२.५०० ( ६ ४७२
       २१९०
       ------
        १७२५
        १४६०
       ------
         २६५०
         २५५५
        ------
           ९५०
           ७३०
          -----
           २२०
```

रु. पा. रे.
४३१ २ ३८८ हें उत्तर.

चवथें, मुद्दल ४५०० रुपये यांचें १ वर्षाचें व्याज दर शेंकडा दर साल ५ रु. प्रमाणें किती रु. होतील तें सांग. २२५ रु. हें उत्तर.

पांचवें, मुद्दल ७१५६ रु. १ पा. यांचें १ वर्षाचें व्याज दर शेंकडा दर साल ४ रु. २ पा. प्रमाणें किती रुपये होतील तें सांग. रु. ३२२ . . पा. ० . . रें. १२½ हें उत्तर.

साहावें, मुद्दल ७२०० रुपयांचें ३ वर्षांचें व्याज दर शेंकडा दर साल ५ रुपये प्रमाणें किती होतात तें सांग. १०८० रुपये हें उत्तर

सातवें, मुद्दल ३५५७ रु. २ पावले यांचें ४ वर्षांचें व्याज दर शेंकडा दर साल ४ रु. प्रमाणें किती होतात तें सांग. रु. ५६९ . पा. ० . रे. ८० हें उत्तर.

आठवें, मुद्दल ३२२ रु. २ पा. ८० रे. यांचें दर शेंकडा दर साल ४ रु. १ पा. प्रमाणें किती रु. व्याज जाहालें तें सांग. रु. १३ . पा. २ . रे. ८६ हें उत्तर

नववें, मुद्दल १७०० रु. यांचें १½ दीड वर्षाचें व्याज दर शेंकडा दर साल ५ रु. प्रमाणें किती रु. होतात तें सांग. रु. १२७ . . पा. २ हें उत्तर.

दाहावें, मुद्दल २००० रुपये यांचें व्याज दर शेंकडा दर साल ४ रु. प्रमाणें ¼ पाव वर्षाचें किती रुपये होतील तें सांग. २० रुपये. हें उत्तर.

अकरावें, मुद्दल ३१०० रुपये यांचें ५ ¾ वर्षांचें व्याज दर शेंकडा दर साल ३ रु. ३ पा. प्रमाणें किती रुपये होतात तें सांग. रु. ६६८ . . पा. १ . . रें. ७५ हें उत्तर

बारावें, मुद्दल १७६०० रु. यांचें दर शेंकडा दर साल ४ रु. ३ पा. प्रमाणें ११७ दिवसांचें व्याज किती रु. होतात तें सांग. साल ह्मणजे ३६५ दिवस.
रु. पा. रे. हें उत्तर

चक्रवाढव्याज.

चक्रवाढ व्याज ज्या राही व्याजावर व्याज ह्मणतात तें तेंच आहे, जें जें मुद्दल आणि व्याज प्रत्येक नियम काळाचे अंतीं एकत्र मिळाल्यापासून उत्पन्न होतें.

प्रथमरीति, प्रथमनियमकाळाचे अंतीं सांगितलें मुद्दलाचें व्याज सरळ व्याजाचे रीतीप्रमाणें करावें, नंतर तें व्याज व मुद्दल एकत्र मिळवावें: आणि ती बेरीज नवें मुद्दल जाहलें, नंतर पुनः नियमकाळाचे अंतीं त्या बेरिजेचें व्याज सरळ व्याजाचे रीतीप्रमाणें करावें. आणि तें व्याज वती पूर्वबेरीज पुनः नवें मुद्दल जाहलें, याप्रमाणें प्रति नियम काळाचे अंतीं करीत जावें, म्हणजे चक्रवाढ व्याज होईल.

दुसरीरीति, एकरुपयाचें व्याज प्रथम नियम कालाचे अंतीं काय जाहलें तें काढावें, आणि यास तो मुद्दल १ रु. मिळवावा; नंतर त्याचा घात करावा असाकीं ज्याचा प्रकाशक नियम काळांची संख्या होईल; मग तो घात मुद्दलानें गुणावा, तो गुणाकार रास म्हणजे व्याजासुद्धां मुद्दल झालें. कदाचित् व्याजच हावें तर राशींतमुद्दल वजा करावें, बाकी राहील तें व्याज झालें.

उदाहरणें.

प्रथम, ७२०० रुपये मुद्दल यासी व्याज दरसाल दरशेंकडा पांचाप्रमाणें ४ वर्षांत रास किती होईल तें सांग.

एथें ५ हा १०० याचा २० वा भाग आहे, आणि १ रुपयाचें व्याज एकवर्षांत $\frac{१}{२०}$ आहे, अथवा .०५, आणि त्याची रास १.०५ आहे याजकरितां.

प्रथमरीतीप्रमाणें.

	रु.	पा.	रे.	
२०)	७२००	०	०	प्रथमवर्षाचें मुद्दल
	३६०	०	०	प्रथम वर्षाचें व्याज
	रु.	पा.	रे.	
२०)	७५६०	०	०	दुसरे वर्षाचें मुद्दल.
	३७८	०	०	दुसरे वर्षाचें व्याज
२०)	७९३८	०	०	तिसरे वर्षाचे मुद्दल.
	३९६	३	६०	तिसरे वर्षाचें व्याज.
२०)	८३३४	३	६०	चवथेवर्षाचें मुद्दल.
	४१६	२	९५	चवथे वर्षाचें व्याज.
	८७५१	२	५५	रास किंवा इच्छिलें उत्तर

रु.	पा.	रे.	
८७५१	२	५५	हें उत्तर.

दुसरेरीतीप्रमाणें.

१·०५ एकरुपयाचीरास
१·०५
१·१०२५ वर्ग.
१·१०२५
१·२१५५०६२५ चतुर्घात.
७२००
२४३१०१२५०००
८५०८५४३७५००
रु· ८७५१·६८७५
४
पा· २·८९००
१००
रें ५८,०००
रु. पा. रे.
रास.८७५१··२· ५८ हें उत्तर.

दुसरें. ५०० रुपये मुद्दलव्याज दरसाल दरशेंकडा पांचाचाप्रमाणें वर्षे ५ झालीं रासकाय होईल तें सांग
रु· पा· रें·
उत्तर, ६३८··०··५६

तिसरें. ५०० रुपये मुद्दल व्याज वर प्रमाणें वर्षे ५ झालीं. परंतु मुदत अर्ध अर्ध वर्षाची तेव्हां १० मुदती झाल्या त्याची रास काय होईल तेंसांग.
रु. पा. रे.
उत्तर, ६४० · · ० · ·१६·९५०८.

चवथें, उदाहरण पूर्वीचेंच मुदत तीन महिन्याची. तेव्हां २० मुदतीझाल्या व्याज काय होईल तें सांग.
रु. पा. रे.
उत्तर, ६४१ · · ० · · ७·४४५२

पांचवें, ३००० रु· मुद्दल. वर्षे ६ झालीं दरसाल दरशेंकडा व्याज ४ रु· प्रमाणें रास काय होईल तें सांग.
रु. पा. रे
उत्तर, ४६८१ · २ ७३·१४.

साहावें. ८१०० रु· मुद्दल वर्षे २ ½ झालीं दरसाल दरशेंकडा व्याज ४½ रुपयेप्रमाणें मुदत ½ वर्षाची रास काय होईलतें सांग.
रु. पा. रे.
उत्तर, १०५३ · · ० · · ७५·७२४०२५

सातवें २१७० रु· मुद्दल वर्षे २ ¾ झालीं दरसाल दरशेंकडा व्याज ५ रु· प्रमाणें मुदत ¼ पाव वर्षाची रास काय होईल तें सांग.
रु. पा. रे.
उत्तर, २४१७ · · ० · · २·७०४.

मिश्रगणित.

मिश्रगणित म्हणजे वेगळाले जातीचे शब्द पदार्थ एकत्र मिश्रकेले, असें कीं, त्या मिश्राची किंमत त्यांचे वेगळाले किंमतीचे मध्ये होईल, तेव्हांत्या

रीति दोन आहेत. एक मध्यमिश्रगणित आणि दुसरें व्युत्क्रम मिश्रगणित.

मध्यमिश्रगणित.

मध्यमिश्रगणित ह्मणजे मिश्रपदार्थांचा दर काढायाची रीति आहे, जेव्हां प्रत्येक शुद्ध पदार्थांचे दर आणि परिमाणें सांगितलीं आहेत.

रीति.

* प्रत्येक शुद्धपदार्थांची परिमाणें त्यांचे त्यांचे दरानें वेगळालीं गुणावीं; नंतर या सर्व गुणाकारांची बेरीज घ्यावी; आणि दुसरी शुद्धपदार्थांचे परिमाणाची बेरीज घ्यावी; नंतर प्रथम बेरीज दुसरे बेरिजेनें भागावी, म्हणजे गुणाकारांची बेरीज परिमाणांचे बेरिजेनें भागावी, भागाकार येईल तो त्या मिश्रराशिचा इच्छिला दरपरिमाण भाव होईल.

उदाहरणें.

प्रथम, तीन जातींची शरकर एकत्र मिळून मिश्रराशि झाली आहे. त्यांत ५० शेर दरशेरीं १२ पैसे दरांची, तसें ४४ शेर दरशेरीं ९ पैसे दराची, आणि २६ शेर दरशेरीं ८ पैसे दराची, असे वेगळाले भाव होते. आतां त्या मिश्रराशीस दरशेरीं काय भाव होईल.

आतां ५०, ४४, २६ हें परिमाण आहे, तर,

५० + १२ = ६००
४४ + ९ = ३९६
२६ + ८ = २०८
१२०) १२०४ (१० $\frac{४}{१२०}$ = १० $\frac{१}{३०}$

आणि १२, ९, ८, हा भाव आहे.

उत्तर १० $\frac{१}{३०}$ पैसे हा मिश्रराशीचा दरशेरीं भाव.

दुसरें, एक चाहा पौंड ५ दरपौंडीं भाव ७ शिलिंग, दुसरा चाहा पौंड ९ दर ८ शिलिंग ६ पेन्स, आणि तिसरा चाहा पौंड १४ $\frac{१}{२}$ दर ५ शिलिंग १० पेन्स प्रमाणें असा तीन प्रकारचा एकत्र केला तर त्या मिश्रास दरपौंडीं भाव काय होईल.

उत्तर, ६ शिलिंग १० $\frac{१}{२}$ पेन्स.

---

* प्रतिपाद्य या रीतीची सत्यता बीजगणितापासून या उदिला प्रमाणें निघते.

अ, ब, क, हीं तीन अक्षर चिन्हें वस्तूंचीं वेगळालीं परिमाणें दाखवायास घे.

आणि म, न, प, हीं तीन अक्षर चिन्हें त्यांचे प्रत्येकीं दर दाखवायास घे.

तर अम, बन, कप, हे त्या तीन राशींचे वेगळाले भाव आहेत

आणि अम + बन + कप, ही त्या वेगळाले तीन राशींचे भावांची बेरीज आहे,

पुनः अ + ब + क ही त्या तीन राशींचे वेगळाले परिमाणाची बेरीज आहे.

आतां जर र, सर्व मिश्रराशींचा भाव दाखविता.

तर (अ + ब + क) + र, ही सर्व मिश्रराशींची किंमत होईल

याजकरितां (अ + ब + क) + र, = अम + बन + कप.

आणि र = अम + बन + कप म्हणजे रीति खरी आहे
अ + ब + क.

तिसरें, एक जातीचें तेल ग्यालन ४ दर ग्यालनीं भाव ४ शि. १० पे. दुसरें तेल ग्यालन ७ दर ५ शि. १ पेन्स आणि तिसरें तेल ग्यालन ९ ३/४ दर ५ शिल्लिंग ८ पेन्स प्रमाणे असें एकत्र केलें तर त्या मिश्रास दर ग्यालनी भाव काय होईल. उत्तर, ५ शिल्लिंग ४ १/२ पेन्स.

चवथें, कोणी फळ्यानें एक जातीचे गहुं १० बुशिल दर बुशिलीं भाव ५ शिल्लिंग, दुसरें गहुं १८ बुशिल दर ३ शिल्लिंग, आणि तिसरें गहुं २० बुशिल दर २ शिल्लिंग प्रमाणें असे एकत्र केलें तर त्या मिश्रास दर बुशिलीं भाव काय होईल.
उत्तर, ३ शिल्लिंग.

पांचवें. कोणी दुकानदारानें एक जातीचें पीठ बुशिल ३ दर बुशिलीं भाव ३ शिल्लिंग ५ पेन्स तसें दुसरे जातीचें बुशिल ४ दर ५ शिल्लिंग ६ पेन्स, आणि तिसरे जातीचें बुशिल ५ दर ४ शिल्लिंग ८ पेन्स प्रमाणें असें एकत्र करून विकूं लागला तर त्या मिश्र राशीस दर बुशिलीं काय भाव होईल.
उत्तर ४ शिल्लिंग ७ १/२ पेन्स.

साहावें, सोनें ७ औंस २२ क्यारेक्ट[∴] चांगलें, तसें १२ १/२ औंस २१ क्यारेक्ट चांगलें, आणि १७ औंस १९ क्यारेक्ट चांगलें, असें एकत्र आटिलें तर त्या मिश्र सोन्यास किती क्यारेक्ट चांगलें भाव लागेल. उत्तर, २० ३/४ क्यारेकट चांगलें.

सातवें, रुपें, १ पौंड ० औंस[+] शुद्ध तसें ५ पौंड ० औंस यांत १० औंस शुद्ध आणि १ पौंड १० औंस हीण असें एकत्र आटिलें तर त्या मिश्रास किती औंस शुद्ध भाव लागेल.
उत्तर, ७ ६/७ औंस शुद्ध.

आठवें, तीन जातींचें तूप मण ५, ९, १४, १/२ दर मणीं भाव रुपये १०, ९, १/२ ८, १/२ असें एकत्र केलें त्या मिश्रास दर मणीं किती रुपये पडतील. उत्तर, ९ रुपये.

नववें, तीन जातींचें दुध शेर ४, ७, ९, ३/४ दर शेरीं पैसे ६, ५, ४, १/२

∴ जर १ औंस अथवा दुसरे कोणतेंही सोन्याचें परिमाण भर शुद्ध सोनें आहे, तर त्याचे बरोबर २४ भाग केले, त्यांस प्रत्येकीं क्यारेक्ट म्हणतात, जसें रुप्याचे भागास औंस म्हणतात परंतु बहुत करून सोनें रुपें यांत दुसरे हीन धातूंचा मिश्र असतात, ज्यास हीण म्हणतात आणि या मिश्र सोन्यास इतके क्यारेक्ट सोनें म्हणतात, जितकें मिश्रांत शुद्ध सोनें आहे

जसें, जर २२ क्यारेक्ट शुद्ध सोनें आणि दोन क्यारेक्ट हीण एकत्र मिळविलें तर या मिश्रास २२ क्यारेक्ट शुद्ध सोनें म्हणतात

जर मिश्रांत मिळाले वेगळाले पदार्थांत एक हीण दुसरे शुद्ध त्यांत मिळाला आहे, तर तो हीन पदार्थ अति हलका म्हणून त्याचा भाव शून्य गणितात

जसा पाण्याचा भाव शून्य होतो, जे दुधांत मिश्रित झालें, तसा हीणाचा भाव शून्य होतो, जे कांहीं सोनें रुपें इत्यादिक उत्तम धातूस मिश्रित झालें.

असें एकत्र केलें त्या मिश्रास दरशेरीं किती पैसे पडतील.

उत्तर, पै. ४ . . रे. ७$\frac{}{६}$.

दाहावें, एक फड्यानें तीनप्रकारचे गहुं मण १०, १८, २०, दरमणीं रुपये ५, ३, २ या भावाचे एकत्र केलेतर त्या मिश्रराशीस दरमणीं किती रुपये पडतील.

उत्तर, ३ रुपये.

अकरावें, कोणी दुकानदारानें ३ जातीचें पीठ मण ३, ४, ५, दरमणी रुपये ३$\frac{३}{४}$, ३, २$\frac{१}{२}$ या दरानें एकत्र केलेंतर त्या मिश्रास दरमणीं किती रु. पडतील.

उत्तर, रु. ३ . पा. २ . . रे. ९$\frac{१}{६}$

बारावें, सोनें तोळे ७, १२$\frac{१}{२}$, १७ त्याचे अनुक्रमें कस ९८, ९६, ९४ असें एकत्र आटिलें तर त्या मिश्रास कस काय लागेल. उत्तर, ९५$\frac{५}{२}$ कस.

तेरावें, सोनें तोळे २१, ३२, ३१$\frac{१}{२}$ त्यास कस ९८, ९६, ९५, असें एकत्र आटिलें तर त्या मिश्रास कस काय लागेल. उत्तर, ९६$\frac{१}{२}$ कस.

व्युत्क्रममिश्रगणित.

व्युत्क्रम मिश्रगणित म्हणजे अनेक सांगितले भावाचे अनेक शुद्ध पदार्थ एकत्र मिश्र केले. तर त्या मिश्रास सांगितला भाव व्हावा, ते व्हां मिश्र करायास कोणते भावाचे पदार्थ किती किती परिमाणानें घ्यावे. ते काढायाचीरीति आहे, ही रीति मध्य मिश्र रीतीचें उलट आहे, म्हणून याचा ताळा मध्य मिश्ररीतीनें निघतो.

प्रथमरीति.+

\+ सिद्धांत, उणा भाव अधिक भावास जोडून आणि त्याचा प्रत्येकीं इच्छिले भावाशीं वजाबाक्या त्या त्या भावासमोर व्युत्क्रमानें लिहून जें परिमाण निघतें, तें असें आहेकीं उणेभावाचे परिमाणावर जितका नफा येतो तितकाच अधिक भावाचें परिमाणावर तोटा आहे, याजकरितां सर्वपरिमाणावर नफा तोटा होईल, तो बरोबर, हा तर इच्छिला भाव आहे, याचप्रमाणें अनेक शुद्धपदार्थ मिश्र केले तरीही जाणावें.

यारीतीनें किती ही शुद्धपदार्थ किती एक शुद्ध पदार्थांशीं जोडिले असतील म्हणजे सर्वदा इष्ट भावाहून उणे असतील ते अधिकाशीं जोडिले जातील, तरीही प्रत्येक युग्मांचा नफा तोटा पूर्वप्रमाणें बरोबरे होईल, आणि याजकरितां सगळ्याचा नफा तोटा बरोबर होईल. हें सिद्ध.

या रीतीपासून कळतेंकीं या जातीचे प्रश्नांस अनेक उत्तरें निघतील कारण, एक उत्तर काढिल्या नंतर इच्छे प्रमाणें हावींतितकीं या रीतीनें निघतील. ती रीती, वेगळाले काढिले परिमाणांस २ किंवा ३ अथवा ४ इत्यादिकानें गुणून किंवा भागून. याचें कारण उघड आहे, जर दोन शुद्ध पदार्थांचीं परिमाणें मध्यभावाशीं नफा तोटा बरोबर करितील, तर त्याचें दुपटीशीं ही किंवा तिपटीशीं ही, या प्रमाणें अनंत पट पर्यंत.

२१	१६	३
	१८	२
	२२	३
	२५	५

या जातीचे प्रश्नास बीजगणित जाणणार अनंतरूप म्हणतात, आणि ज्या पासून जितकीं उत्तरे निघतील तितकीं काढायाचा सिद्धांत बीजगणित रीतीनें करितां येतो.

शुद्ध पदार्थांचे भाव एकाखालीं एकयेतील असे लिहावे = २ इच्छिलें मिश्रभावा हून जे शुद्ध पदार्थांचे भाव उणे असतील त्यांस प्रत्येकीं मिश्र भावाहून अधिक असतील त्याशीं अखंड रेषा करून जोडावें. आणि याच रीतीनें प्रत्येक अधिकास प्रत्येक उण्याशीं मिळवावें; — ३ मिश्रभाव आणि प्रत्येक शुद्धभाव यांच्या वजाबाक्या ह्मणजे अंतरें तीं शुद्धभाव ज्याशीं जसे मिळविले आहेत, त्यांचे त्यांचे समोर लिहावीं, नंतर एकच वजाबाकी त्या भावाचे समोर आली तर तीच त्या राशीचें परिमाण होईल. आणि अनेक वजाबाक्या आल्या तर त्यांची बेरीज त्या राशीचें परिमाण होईल.

प्रत्येक उदाहरणाचा ताळा मध्य मिश्ररीतीनें निघतो.

उदाहरणें.

प्रथम, कोणी एक सावकार १६, १८, २२, रुपये खंडी असे तीन जातीचे चणे वेगळाले किती किती परिमाणानें घ्यावे ह्मणजे मिश्रराशीस इच्छिला भाव पडेल.

रु० २० { १६, १८, २२ }

२ खंडी १६चे भावाचे. तर २+१६=३२

२ खंडी १८चे भावाचे. २+१८=३६

४+२=६ खंडी २२चे भावाचे. ६+२२=१३२

खंडी १० रु. २००

याचा ताळा मध्यमिश्ररीतीनें.

२, २, ६ खंडी हीं परिमाणें.

१६, १८, २२ रुपये हे भाव.

दुसरें, कोणी दुकानदार ४ आणि ६ रुपये मण असें दोन भावांचे तेल मिश्र करून ५ रुपये मण या भावानें विकायास इच्छितो. तर त्यानें मिश्र करायास दोन जातींचें तेल प्रत्येकीं किती किती परिमाणानें घ्यावें.
उत्तर, १ खंडी मण किंवा शेर.

तिसरें, कोणी दुकानदार ४, ६, ११ पैसे शेर असे तीन भावांची साखर एकत्र मिश्र करून ७ पैसे शेर या भावानें विकायास इच्छितो तर त्यानें मिश्र करायास प्रत्येक भावाची साखर किती किती परिमाणानें घ्यावी.
उत्तर, १ शेर किंवा मण किंवा खंडी.

चवथें, कोणी दुकानदार दर बुशिल २ शिलिंग ६ पे० ३ शि० ८ पे० ४ शि० आणि ४ शिलिंग, ८ पेन्स. असे चार भावाचे गहूं एकत्र मिश्र करून दर बुशिल ३ शिलिंग १ पेन्स. या भावानें विकायास इच्छितो. तर त्यानें मिश्र करायास कोणकोणते गहूं किती किती परिमाणानें घ्यावे.
उत्तर, २ शि० ६ पे० या दराचे २ बु० ३ शि० ८ पे० या दराचे २ बु० ४ शि०, या० चे ३ बु०, आणि ४ शि० ८ पे० या० चे ३ बुशिल.

पांचवें, कोणी सोनार, १६, १८, २२, २४ क्यारेकूट चांगलें या दरांचे सोनें एकत्र आटून मिश्रसोनें २१ क्यारेकूट चांगलें करायास इच्छितो तर त्यानें कोणकोणतें सोनें किती किती परिमाणानें घ्यावें.

उत्तर, १६ क्यारेकूटचें ३ भाग १८चें ३ भाग, २२चें ५ भाग, आणि २४चें ५ भाग.

साहावें, कोणी दुकानदार मध १२ रु. मण, राब १० रु. मण, काकवी १ रुप. मण आणि पाणी ० रुपये मण, अशीं एकत्र मिश्र करून त्या मिश्रास दरमणीं ८ रुपयांचा भाव व्हावा असें इच्छितो तर त्यानें प्रत्येक कायकाय परिमाणानें घ्यावीं.

उत्तर, मध १५ राब १५ काकवी ६ आणि पाणी ६ मण.

दुसरी रीति.

जेव्हां मिश्राचें परिमाण सांगितलें आहे, पूर्वी सांगितले जोडण्याचे रीतीनें करून उत्तर काढावें नंतर या प्रमाणें प्रमाण राशी कराव्या, जशी परिमाणांची बेरीज : सांगितले परिमाणास आहे : : तसें जोडण्यांचे रीतीनें काढिलेले शब्द पदार्थ : प्रत्येकांचे इच्छिले परिमाणास होतील.

प्रथम, १५, १७, १८, २२ क्यारेकूट चांगलें एकत्र आटायाचें आहे, असें कीं, तें मिश्र ४० तोळे २० क्यारेकट चांगलें होईल, तर वेगळालें त्यात्याजातीचें किती तोळे घ्यावें.

आतां २०	१५		२	जसें १६ : ४० : : २ : ५
	१७		२	१६ : ४० : : २ : ५
	१८		२	१६ : ४० : : २ : ५
	२२	५+३+२=१०		१६ : ४० : : २ : २५
		१६		

उत्तर, १५चें ५, १७चें ५, आणि २२चे २५, तोळे.*

---

* यास्थळीं धातूचे स्वभावावर अनेक प्रश्न सांगतां येतील. परंतु त्यांतून बहुचमत्कारीक एकच प्रश्न पुरे. हैरो यानामें सैराक्युसचा पातशाह होता. त्यानें, सगळा शुद्ध सोन्याचा मुकुट सोनाराजवळ करायास सांगितला, नंतर, तो त्यानें करून आणि त्यावर त्यांत कांहीं रुपें किंवा तांबें मिश्र केलें असें नजरेस आलें. परंतु तें कितीयाचा निश्चय व्हावा म्हणून आर्किमीटीज यानामें एक चतुरपुरुष अतिप्रसिद्ध तोही तेथें होता. तेव्हां त्या मुकुटांतील हिणाचें परिमाण काढायास तो त्या चतुर पुरुषाजवळ दिल्हा उटें.

त्यानें एक शुद्ध सोन्याची एक तांबें किंवा रुपेंयाची याप्रमाणें दोन भरींव आकृती करून त्या पाण्यानें तोंडपर्यंत भरलेले पात्रांत पर्यायानें बुडविल्या, नंतर त्या आकृतींच्यायोगें पात्रांतून बाहेर पडलें पाण्याचीं तोळें केल्यापासून त्या भरींव आकृतीचें त्वभार त्यास विदित झाले म्हणजे या पासून आणि त्या प्रत्येकांचे सांगितले वजनापासून त्या मुकुटांत शुद्ध सोनें आणि हीण किती होतें त्याचें परिमाण काढितां आलें.

आतां कल्पना कर कीं, त्या भरींव आकृति व मुकुट यांचें प्रत्येक वजन १० शेर आहे आणि शुद्ध रुपें किंवा तांबें यांचें भरींवाकृति मुकुटामुळें पात्रांतून बाहेर पडले पाणी १२ शेर आणि शुद्ध सोन्याचें भरींवाकृति मुकुटामुळें पात्रांतून बाहेर पडलें पाणी ५२ शेर, आणि त्या मिश्र सोन्याचे मुकुटामुळें पात्रांतून बा

दुसरें, ४, ५, ६, ८ रुपये मण याचार भावांचे तंदुळ एकत्रमिश्र करून ते २० मण ७ रुपयांचे भावानें विकावयास इच्छितो, तर ते वेगळाले किती किती मण घ्यावे.

उत्तर, ४चे २ $\frac{२}{३}$, ५चे २ $\frac{२}{३}$, ६चे २ $\frac{२}{३}$ आणि ८चे १३ $\frac{१}{३}$ मण.

तिसरीरीति.

जेव्हां एक शुद्ध पदार्थाचें परिमाण अमुक असावें ह्मणून सांगितलें आहे, तर पूर्व रीती प्रमाणें प्रत्येक पदार्थाचे भावांच्या दरभावाशीं वजाबाक्या कराव्या. नंतर या प्रमाणें राशी कराव्या, जसें सांगितलें परिमाणाचे शुद्ध पदार्थाची वजाबाकी : दुसरे वेगळे वेगळे वजाबाक्यांस होतें : : तसें सांगितलें परिमाण : वेगळे वेगळे इच्छिलें परिमाणास होईल.

उदाहरणें.

प्रथम, दर ग्यालन ४ शिलिंग, दर ग्यालन ५ शिलिंग दर ग्यालन ५ शिलिंग ६ पेन्स, आणि दर ग्यालन ६ शिलिंग असे ४ जातीचे पदार्थ मिश्र करायाचे त्यांत प्रथम ४ शिलिंग दराचा पदार्थ ३ ग्यालन घालणें आहे, आणि मिश्रास दर ग्यालनीं ५ शिलिंग ४ पेन्स असा भाव व्हावा तर प्रत्येकांचें परिमाण किती किती घ्यावें.

आतां ६४	४८	२ + ८ = १०	तर जसें १० : १० : : ३ : ३ ग्या.
	६०	२ + ८ = १०	१० : १० : : ३ : ३ ग्या.
	६६	१६ + ४ = २०	१० : २० : : ३ : ६ ग्या.
	७२	१६ + ४ = २०	१० : २० : : ३ : ६ ग्या.

उत्तर, ५ शिलिंगचे ३ ग्यालन, ५ शिलिंग ६ पेन्सचे ६ ग्याल०, ६ शिलिंगचे ६ ग्यालन.

दुसरें, कोणी एक वाणी १२, १०, ६, ४ रुपये खंडी दराचे दाणे एकत्रमिश्र करायास इच्छितो. परंतु त्यांत शेवटील ४ रुपये खंडी दराचे २० खंडी घालायाचे आहेत, आणि त्या मिश्रास ८ रुपये खंडी असा भाव व्हावा तर त्यानें प्रत्येक भावाचें किती किती घ्यावें.

उत्तर, ४ रुपयांचे भावाचे २० खंडी, ६ रु. चे १० खं; १० रु. चे १० खं; १२ रु. चे २० खं.

हे पडलें पाणीं ६४ शेर, तर त्या मुकुटांतील शुद्ध सोनें आणि तांबें यांचें प्रत्येक परिमाण काय होईल
आतां केवळ तांबें किंवा रुपें याचा भाव १२ शुद्ध सोन्याचा ५२ आणि मिश्राचा ६४ आहे.
याज करितां ६४ { ५२ / १२ } १२ / २८ आणि याची बेरीज म्हणजे १२ + २८ = ४० परंतु ही १० पाहिजे या
ज करितां रीती प्रमाणें ४० : १० : : १२ : ३. शेर तांबें.
४० : १० : : २८ . ७ : शेर शुद्ध सोनें } हें उत्तर.

● अनेक पदार्थ असून अमुक परिमाणाचे असावे असें सांगितलें असेल तरी ह्या याच रीतीनें एकाचें परिमाण काढून मग दुसऱ्याचें काढावें. अशा प्रकुरमं सर्वांचीं परिमाणें निघतील. यांत दुसरी आणि तिसरी यांलांना आधार सांगायाचें अगत्य नाहीं कारण, या दोनही प्रथम रीतीपासून निघतात त्यामुळे त्याचें पूर्वीच वर्णन केलें गेलें आहे.

तिसरें, १५, १७, १८, २२ क्यारेकूर चांगलें सोनें आहून मिश्रक रायास इच्छितो, परंतु, त्यांत तिसरे १८ क्यारेकरचें ५ तोळे घालणें आणि मिश्र २० क्यारेकर चांगलें व्हावें. तर बाकीचें किती किती तोळे घ्यावें.

उत्तर, १५चें ५ तोळे. १७चें ५ तोळे, २२चें २५ तोळे.

इष्टराशि.

इष्टराशि म्हणजे किती एक प्रश्नांचीं उत्तरें उघड करायाची एक रीति आहे कीं, ज्या प्रश्नांचीं उत्तरें साधारण पूर्व रीतींकरून उघड होत नाहींत, कोणेवेळेस या रीतीस मिथ्याप नोद्भूत ह्मणतात, कारण, सत्य संख्ये प्रमाणें मनःकल्पित मिथ्या संख्यानीं काम केल्या पासून शेवटीं सत्य संख्या उत्पन्न होते, कोणी या रीतीस चुकशोध ह्मणतात, कारण, मिथ्या संख्यांचे तपशीलानें शोध करितात, आणि चुक मिळविल्या पासून सत्य संख्या उत्पन्न होते.

ती एकेरी आणि दुहेरी या भेदेंकरून दोन प्रकारची आहे.

एकेरी इष्टराशि.

एकेरी इष्टराशि तीच होय कीं जी पासून एकच मिथ्या संख्येचे साह्यानें प्रश्नाचें उत्तर उघडतें. प्रश्नें जें उत्तर त्याचें मिथ्या संख्येशीं प्रमाणांत आहे, ते प्रश्न एकेरी इष्ट राशींतील होत, म्हणजे असें, इच्छिले संख्येस दुसरें सांगितले संख्येनें गुणायाचें किंवा भागायाचें आहे, अथवा, जेव्हां इच्छिली संख्या तिणे तीच अथवा तिचे हर कोणते भागानें किती एक सांगितल्या वेळा अधीक किंवा उणी करायाची आहे.

रीति.

इच्छिली संख्या काढायाकरितां कोणती ही संख्या घ्यावी, आणि प्रश्नांत सांगितल्या प्रमाणें तिशीं काम करावें, नंतर या प्रमाणें प्रमाण राशी कराव्या. जसें मिथ्या संख्येचें उत्पन्न : त्या मिथ्या संख्येस आहे : : तसें प्रश्नांतील उत्पन्न : त्याचे इच्छिले सत्य संख्येस होईल.*

प्रथम, एक मनुष्यानें आपले द्रव्याचा $\frac{१}{३}$ आणि $\frac{१}{४}$ खर्च केल्यानंतर पाहातो तों ६०० रुपये बाकी राहिले, तेव्हां त्याजवळ पहिलें द्रव्य किती होतें.

पहिलें द्रव्य १२०० रुपये अशी मिथ्या संख्या घे.

---

* या रीतीचें कारण उघड आहे कीं, उत्पन्नें आपआपले संख्यांशीं प्रमाणांत आहेत.

जसें न अ : अ : : न ज : ज. अथवा $\frac{अ}{न}$: अ : : $\frac{ज}{न}$: ज

किंवा $\frac{अ}{न} + \frac{अ}{म}$ इत्यादि : अ : : $\frac{ज}{न} + \frac{ज}{म}$: ज. आणि इत्यादि.

आतां १२०० चा $\frac{1}{3}$ = ४००
आणि १२०० चा $\frac{1}{4}$ = ३००
———
७००
१२००
———
५०० बाकी.

जसें, ५००:१२००::६००:१४४० ही इच्छिली राशि हें उत्तर.

याचा ताळा.
१४४० चा $\frac{1}{3}$ = ४८०
१४४० चा $\frac{1}{4}$ = ३६०
———
= ८४०

१४४०
———
६०० ही बाकी प्रश्नाप्रमाणें आहे.

दुसरें, ती संख्या काय आहे, जी ७ यानीं गुणून तो गुणाकार ६ यानीं भागिला असतां भागाकार २१ येईल. उत्तर १८

तिसरें, ती संख्या काय आहे कीं जीतिचे अर्धानें, तृतीयांशानें आणि चतुर्थांशानें युक्त केली असतां ७५ बेरीज होईल.

उत्तर, ३६

चवथें, एक सर्दारानें आपले फौजेचा $\frac{1}{2}$ आणि $\frac{1}{3}$ कं. हीस पाठविला असतां तत्रावर १००० मनुष्यें राहिलीं तेव्हां त्या फौजेंत सर्व मनुष्यें किती होतीं.

उत्तर ६००० मनुष्यें.

पांचवें, कोणीएक गृहस्थानें भिकाऱ्यास ५२ पैसे वांटले त्यांत भती केल्या, पुरुषास ६ बायकोस ४ आणि पोरास २ याप्रमाणें आणि त्यांत बायका पुरुषांचे दुप्पट, आणि पोरें बायकांचे तिप्पट अशीं होतीं तेव्हां पुरुष, बायका आणि पोरें अशीं त्या जमावांत किती किती होतीं.

उत्तर, पुरुष २ बायका ४ आणि पोरें १२

साहावें, दोघे भलेमनुष्य मार्गांत गोष्टी करित चालिले होते, त्यांत एकानें दुसऱ्यास विचारिलें कीं, तुह्मास वय किती आहे, तेव्हां त्यानें उत्तर केलें कीं माझे वयाचे वर्षांचे $\frac{1}{2}$ सातानीं गुणिले आणि त्या गुणाकारांत त्याच वर्षांचे $\frac{1}{3}$ मिळविले तर २१९ होतात, तेव्हां त्याचे वयाचीं किती वर्षें आहेत.

उत्तर. ४५ वर्षें,

दुहेरी इष्टराशि.

दुहेरी इष्टराशी म्हणजे किती एक प्रश्नांचीं उत्तरें दोन मिथ्यासंख्यांचे साहाय्यानें उघड करायाची रीति.

दुसरे प्रश्न इष्टराशींत असे प्रश्न येतात कीं. ज्यांचीं उत्तरें सत्यसंख्या इष्टराशी-च्या प्रमाणांत नाहींत, जसें या प्रश्नांत, ज्यांत इच्छिलीसंख्या त्या संख्येचा भाग किंवा समगुणाकार यांतून एक प्रकारानें वाढविली किंवा सांगितलेले संख्येनें उणीकेली, जीसांगितलीसंख्या इच्छिलसंख्येचा कोणता भाग आहे हें ठाऊक नाहीं.

प्रथमरीति.*

सुमारानें कामाचे उपयोगी दोन मिथ्या संख्या घ्याव्या, आणि त्यांशीं प्रश्नांचे संकेताप्रमाणें वेगळाली एकेरीरीतीप्रमाणें कामें करावीं. नंतर पाहावें कीं, या दोन संख्यापासून जीं दोन उत्पन्नें होतील त्यांत आणि प्रश्नास किती भेद आहे, याचे दास अंतर ह्मणतात. तें अंतर अधिक किंवा उणें असेल त्याप्रमाणें त्यास (+) करून (-) चिन्हें करावीं.

नंतर तीं दोन अंतरें गुणावीं अशीं कीं दुसरे अंतरानें प्रथमसंख्या गुणिली जाईल, आणि प्रथम अंतरानें दुसरी संख्या, तेव्हां.

जर अंतरांचीं चिन्हें सरूप आहेत, तर वरचे गुणाकारांची वजाबाकी त्या अंतरांचे वजाबाकीनें भागावी, भागाकार येईल तो उत्तर होईल.

परंतु अंतरांचीं चिन्हें विरूप आहेत, तर उत्तराकरितां वरचे गुणाकारां-

---

* सिद्धांत यारीतीस आश्रय हा आहे कीं, प्रथम अंतर दुसरें अंतरास आहे, जशी प्रथममिथ्यासंख्या आणि प्रथम सत्यसंख्या यांची वजाबाकी, दुसरी मिथ्यासंख्या आणि दुसरी सत्यसंख्या यांचे वजाबाकीस आहे. जेव्हां अशाप्रमाणांत नाहीं, तेव्हां यारीतीनें उत्तर बरोबर काढितां येत नाहीं. ही रीति खरी आहे असें पूर्व आश्रयावरून दाखविता.

अ, आणि ब, हीं दोन अक्षरचिन्हें घेतले संख्यांचीं असतील. तसें आ आणि बा हीं त्यांचीं प्रश्नाचे संकेताप्रमाणें उत्पन्नें असतील. तसें र आणि स हीं त्यांचीं अक्षरें असतील, म्हणजे न हें संकेताचें सत्यउत्पन्न याशीं वेगळाल्या आ आणि बा यांच्या वजाबाक्या र आणि स असतील, आणि इष्टसंख्यादाखवायास क्ष घेतला ह्मणजे क्षनें उत्पन्न होईल.

तेव्हां न-आ=र आणि न-बा=स अथवा बा-आ=र-स आतां ज्यांस यारीतींचा आश्रय आहे, त्या प्रमाणाप्रमाणें र : स : : क्ष-अ : क्ष-ब अंत्यपदें आणि मध्यपदें गुणून म्हणजे रक्ष-रब=सक्ष-सअ अनंतर स्थळांतरानें रक्ष-सक्ष=रब-सअ. भागाकारानें $क्ष=\frac{\text{रब}-\text{सअ}}{\text{र}-\text{स}}$ ही इच्छिली संख्या आहे, म्हणजे हीरीति तेव्हां आहे कीं, जेव्हां दोन्हीं अंतरें कमी पडतात.

जर दोन्हीं उत्पन्नें सत्यउत्पन्नाहून अधिक असतील, म्हणजे आ आणि बा, ही दोन्हीं न, हून अधिक असतील, तर न-आ=-र आणि न-बा=-स, ह्मणजे र आणि स, हीं दोन हीं (-) ऋण आहेत. याजकरितां -र : -स : : क्ष-अ : क्ष-ब, परंतु -र : -स : : +र : +स. याजकरितां र : स : : क्ष-अ : क्ष-ब, आणि सर्व बाकी पूर्व प्रकाराप्रमाणें बरोबर निघेल.

परंतु जर एक उत्पन्न आ कमी आणि दुसरें उत्पन्न बा अधिक असेल. अथवा एक अंतर र (+) धन आणि दुसरें अंतर स (-) असेल तर पूर्वप्रमाणें प्रमाणराशी करून समीकरणाचें रूप होईल. $क्ष=\frac{\text{रब}+\text{सअ}}{\text{र}+\text{स}}$ आणि ही रीति अंतरें विरूप आहेत तेव्हां उपयोगी होय.

ची बेरीज त्याच अंतराचे बेरिजेनें भागावी.

टीप, दोन अंतरांची चिन्हें धन किंवा ऋण आहेत तर तीं सरूप होत, एक धन आणि एक ऋण अशीं आहेत तर तीं विरूप होत.

उदाहरणें.

प्रथम, ती संख्या काय आहे कीं, जी ६ यानीं गुणून त्या गुणाकारांत १८ मिळविले आणि ती बेरीज ९ यानीं भागिली, तर भागाकार २० होईल.

आतां १८ आणि ३० या दोन मिथ्या संख्या सत्यसारिख्या मानून घे.

प्रथमसंख्या.		दुसरीसंख्या.	ताळा.
१८		३०	२७
६		६	६
१०८		१८०	१६२
१८		१८	१८
१२६		९) १९८	९) १८०
१४	उत्पन्नें.	२२	२०
२०	सांगितलें उत्पन्न	२०	
− ६	अंतरें	+ २	
३०		१८	
१८०		३६	
३६			
९) २१६	गुणाकाराची बेरीज.		
२७	इच्छिली संख्या, हें उत्तर.		

दुसरी रीति.

गणिताचा तपशील करून इच्छिलें संख्येचे अति सन्निध दोन संख्या काढून त्याशीं प्रश्नाचे संकेताप्रमाणें वेगळाली कामें करावीं. नंतर जीं उत्पन्नें होतील, तीं अधिक उणी पाहून त्यांस (+) धन (−) ऋण चिन्हें अनुक्रमें करावीं.

या अति संनिध संख्यांची वजाबाकी त्यांतील एक अंतरानें गुणावी आणि ता गुणाकार त्या अंतरांचे वजाबाकीनें भागावा, जर तीं अंतरें सरूप आहेत. आणि विरूप आहेत, तर त्याचे बेरिजेनें भागावा अथवा या प्रमाणें प्रमाण राशी करावी.

जशी दोन अंतरांची वजाबाकी : किंवा दोन उत्पन्नाची वजाबाकी : : दोन धनुल अति संनिध संख्यांचे वजाबाकीस आहे : : तसें कोणतें ही अंतर : तें आपले संख्येस शुद्ध करावयाचें.

नंतर तो भागाकार किंवा तें इच्छाफळ आपली संख्या अधिक असल्यास तींतून वजा करावें आणि आपली संख्या उणी असल्यास त्यांत मिळवावें. म्हणजे इच्छिली संख्या उत्पन्न होईल.

उदाहरणें.

प्रथम. पूर्व उदाहरण आहे तेंच या रीतीनें करावें.

प्रथमसंख्या.
$\frac{३}{८}$

-६--अंतरें--+२
३० या अधिकसंख्येंतून.
३ वजाकरून
२७ बाकी इच्छिलीसंख्या. हेंउत्तर.

दुसरीसंख्या.
३० याचीवजाबाकी १२
लाहान अंतर २
याची बेरीज ८)२४
३ भागाकार.

अथवा, २२-१४:३०-१८:: किंवा ८:१२::२:३. पूर्वप्रमाणें ३० यासंख्येनें शक्ष होईल.*

दुसरें, बापआणिलेंक हे दोघे बोलत होते, तेथें लेंकानें बापास विचारिलें, बाबा तुह्मास वय काय आहे, बाप सांगतो, अरे बाळा आज तुझें वय माझे वयाचा $\frac{१}{३}$ आहे परंतु ५ वर्षांपूर्वी तुझें वय माझे वयाचा $\frac{१}{४}$ होतें तेव्हां त्या दोघांचीं वयें काय आ.
उत्तर, १५ आणि ४५.

तिसरें, कोणीगृहस्थानें प्रतिदिवशीं १$\frac{१}{२}$ प्रमाणें २० दिवसांचे करारानें एक कारागीर ठेविला, त्याची करारी येणेंप्रमाणें, तो कारागीर ज्या दिवशीं खेळेल किंवा गैरहजीर होईल त्या दिवसाचा त्यापासून उलटा रुपया $\frac{१}{२}$ दंड घ्यावा, पुढें करारीचे दिवस पुरे झाल्यानंतर त्या गृहस्थाकडे त्या कारागिराचे रुपये २२ वरविले. तेव्हां त्यानें किती दिवस काम केलें.
उत्तर, १६ दिवस.

चवथें, अ, आणि ब. हे दोघे बरोबर समान रुपये घेऊन जुगार खेळायास बसले तों प्रथमच अ. रुपये २० जिंकिला, नंतर जवळचे सर्वपैक्याचे $\frac{१}{२}$ हारला, शेवटीं खेळ संपून उठले, ते समयीं बचे जवळ अचे चौपट पैका झाला, तेव्हां प्रत्येकाजवळ आरंभीं किती रुपये होते
(उत्तर, १०० रुपये.

पांचवें, अ, आणि ब या दोघांचा आदाय बरोबर आहे, त्यांत अ आपले आदायाचा $\frac{१}{५}$ संग्रह करितो, परंतु ब प्रतिवर्षी अ पेक्षां ५०० रुपये अधिक खर्च करितो, आणि ४ वर्षांनंतर बला १००० रुपये कर्ज झालें, तेव्हां प्रतिवर्षी एकेकाचा आदाय व खर्च किती तो सांग.
उत्तर. १२५० प्रत्येकाचा आदाय. आणि अचा खर्च प्रतिवर्षी १००० रु. बचा १५०० रुपये.

गणितांतील कामाचे प्रश्न.

प्रथम, तोफेचे गोळ्याचा पोंचावेग काळमानाचे १ सेकंदांत २०० फुट आहे तर त्या मानानें पृथ्वीपासून सुटलेला गोळा सूर्यमंडळीं पोंचण्यास किती वेळ लागेल, सू

---

* ह्मणजे पूर्वे आश्रय मांगितला त्या प्रमाणें र : स :: क्ष-अ : क्ष-ब. या जकरितां भागाकारानें र स :: ब-अ : क्ष-ब. परंतु बा-आ = र स या जकरितां बा-आ : स ; ब-अ : क्ष-ब अथवा बा-आ : ब-अ :: स : क्ष-ब. म्हणजे ही दुसरी रीति आहे.

र्य आणि पृथ्वी यांचेमध्यें अंतर १००००००००मैल असें कल्पिलें आणि एक वर्ष म्हणजे ३६५ दिवस ६ अवर. उत्तर. ८ $\frac{४८०८}{१३१४०}$ वर्षे.

दुसरा, तोफेचा गोळा बाहेर पडतो ते समयीं त्याचा वेग १ सेकंदांत १५०० फुट जाण्याचा असतो आणि सूर्याचा प्रकाश सूर्यापासून पृथ्वीवर पोंचण्यास ७ $\frac{१}{२}$ मिनुटें लागतात, तेव्हां प्रकाशाचे वेगाचें त्या तोफेचे गोळ्याचे वेगाशीं गुणोत्तर काय आहे. उत्तर, जसें ७८२२२२ $\frac{२}{३}$: १ एकाला.

तिसरा, एक मिनुटांत ७० पावलें चालतो. पाउल ह्मणजे २८ इंच, तर या भावानें एक अवरांत किती चालेल. उत्तर. १ $\frac{११३}{१३२}$ मैल.

चवथा, एक सेकंदांत २ पावलें अथवा एक मिनुटांत १२० पावलें चालतो. पाउल ह्मणजे २८ इंच. तर या भावानें कोणी शिपाई कुच करून चालते समई १ अवरांत किती चालेल. आणि एक ठाणें २० मैल दूर आहे, तेथें त्याच शिपायास पोंचण्यास या भावानें किती वेळ लागेल. मार्गी विश्रांतीस एक अवर अवकाश दिला आहे. उत्तर. ३ $\frac{३}{११}$ मैल १ अवरांत चालेल. आणि अ. ५ मि. १६ $\frac{२}{३}$ वेळ लागेल.

पांचवा. ७०० यार्ड लांबीची एक भिंत २० दिवसांत सिद्ध करायाचा संकेत, त्यांत १२ माणसांनीं ११ दिवस काम केलें. तों ती भिंत २२० यार्ड मात्र सिद्ध झाली. तेव्हां या भावानें काम चालविणें तर पूर्वसंकेताप्रमाणें भिंत पुरी होण्यास पूर्वसंख्येहून किती माणसें अधिक असावीं.

उत्तर, ४ माणसें पूर्वसंख्येहून अधिक.

साहावा. ५०००००००० रुपये एकाशीं एक लागून एका पुढें एक असे भूमीवर एक सरळ रेषेंत ठेविले, मनांत आणावें. एकेक रुपयाचा व्यास एकेक इंच आहे. तर ती रुपयांची ओळ किती लांब होईल.

उत्तर, मै. ७८९१ या. ७२८ फु. २ इं. ८.

सातवा. एक शेताचे भोंवता बांध आहे, त्याची परिमिती ५३८ यार्ड आहे, आणि त्या शेताचे समोरासमोरचे बाजूंवर अ, आणि ब, हे दोघे मनुष्य उभे आहेत त्यांत अ एक मिनुटांत ११ यार्ड चालतो, आणि ब तीन मिनुटांत ३४ यार्ड चालतो, ते दोघे शेतास सव्य प्रदक्षिणा करायास उभे होते तेथून एक काळींच निघाले. तर लवकर चालणाराच्या किती प्रदक्षिणा होतील. तेव्हां पुढील मट चालणारास मिळवील. उत्तर. १७ प्रदक्षिणा.

आठवा. कोणी एकला मनुष्य अ १२ दिवसांत जें काम करितो आणि

तेंच काम दुसरा मनुष्य व एकला १४ दिवसांत करितो जर तेंच काम ते दोघे मि ळून करितील तर किती दिवस लागतील. उत्तर, ९ $\frac{५}{१३}$ दिवस.

नववा. एक तांब्याचे खाणींत एकाचा भाग $\frac{३}{८}$ आहेत, त्यानें त्यां तून $\frac{३}{५}$ एक मनुष्यास १०००० रुपयांस विकले. तेव्हां त्या सगळे खाणीचें मोल काय होईल. उत्तर. ४०००० रुपये.

दाहावा. कोणी एक मनुष्य आपले प्राप्तीचे एक चतुर्थ अंशाहून २० रुपये अधिक खर्च करितो. तथापि त्याचे जवळ प्राप्तीचे अर्धाहून ३०० रुप. अधिक संग्रह राहतो. तेव्हां त्याची सर्व प्राप्ती किती. (उत्तर २००० रुप.

अकरावा. घड्याळांतील मिन्यूट कांटा आणि अवर कांटा हे दोन्ही १२ अवरांचे स्थानी एकत्र होते, ते पुनः पुढें केव्हां एकत्र होतील.

उत्तर. १ $\frac{१}{११}$ अवर किंवा अ. मि. से. १. ५. २७ $\frac{३}{११}$

बारावा. कोणी एक मनुष्याची प्राप्ती एक वर्षाची १५००० रुपये आहे त. आणि एक आठवड्यांत ३१० रुपये खर्च करितो. तेव्हां वर्षांनीं किती रु पये संग्रह किंवा कर्ज होईल. एथें वर्ष विलायती मानावें.

उत्तर. ४०८० रुपये संग्रह.

तेरावा. कोणी एक मनुष्यानें दर पैशास २ प्रमाणें १०० आंबे विक त घेतले पुनः दर पैशास ३ प्रमाणें दुसरे १०० आंबे विकत घेतले. नंतर दो न पैशांनें ५ प्रमाणें ते सर्व आंबे विकले. तेव्हां मुदलांत नफा किंवा तोटा कि ती झाला तो सांग. (उत्तर. ६ पैसे तोटा झाला.

चवदावा. दर आसामीस दर दिवशीं दोन शेर प्रमाणें १५०० मनु ष्यांस १२ आठवडे पर्यंत पुरेल इतकें अन्न कोठींत आहे. तेंच अन्न दर आ सामीस दर दिवशीं १ $\frac{१}{२}$ शेर प्रमाणें केल्यास २० आठवडे पर्यंत किती मनुष्यां स पुरेल. (उत्तर. १२०० मनुष्यास.

पंधरावा. लंडन शहराचे अक्षांशवृत्तांत पृथ्वीचे भोंवती त्या स्थळीं अक्षांशवृत्त परिघाची लांबी १५५५० मेल आहे. आणि पृथ्वी आपले अंसा वर २३ अवर ५६ मिन्युटांत पश्चिमेकडून पूर्वेकडे प्रदक्षिण एक वार फि रते, तेव्हां या भावानें एक अवरांत फिरण्याचें गमन किती आहे तें सांग.

उत्तर. ६५० $\frac{३५०}{३५९}$ मेल.

सोळावा, कोणी मनुष्य अंतकाळीं आपलें सर्व द्रव्य पुत्रास देऊन - आपण मरण पावला नंतर त्या पुत्रानें त्या द्रव्याचा $\frac{१}{३}$ भाग सहा महिन्यांत खर्च-

केला. नंतर बाकी राहिले द्रव्याचे $\frac{३}{५}$ बारामहिन्यांत उपजीविकेस खर्च करून हिसाब पाहातो तों ८२०० रु. बाकी राहिले. तेव्हां सर्व द्रव्य किती होतें तें सांग.

रु. पा. रे.
उत्तर. १९१३३ .. १ .. ३२ सगळें द्र.

सत्रावा. एका किल्यास शत्रूनें फौजेचा वेढा दिला होता त्या किल्यांत १००० मनुष्य होते, त्यांस भक्षायास प्रतिदिवशीं प्रति मनुष्यास २ शेर प्रमाणें ५ आठवडे पर्यंत पुरेल इतकें अन्नसंग्रहीं होतें. तेच समयीं त्यांचे कुमकेस ५०० मनुष्य किल्यांत आले. परंतु वेढा उठवाया जोगती कुमक येण्यास ८ आठवड्यांचा अवकाश आहे, तेव्हां तेंच अन्न त्या सर्वांस ते यपर्यंत पुरविणें प्राप्त. तेव्हां दर मनुष्यास दरदिवशीं किती शेर प्रमाणें द्यावें तें सांग.

उत्तर. ३ $\frac{१}{२}$ पावशेर.

अठरावा. कोणी एक मनुष्यानें आपले अंतकाळीं धाकटे पुत्रास ८४००० रुपये दिले, हे वडील पुत्रास जें द्रव्य दिलें त्याचे $\frac{४}{५}$ होतात, तेव्हां त्या मनुष्याचें सर्व द्रव्य किती तें सांग. उत्तर. १८९००० सर्व द्रव्य.

एकुणीसावा. कोणी एक मनुष्य घड्याळाचे काट्यावर दृष्टी ठेऊन बसला होता, त्यास दुसऱ्यानें विचारिलें. किती अवर झाले. तेव्हां तो म्हणतो. पांचापासून साहा इतक्यांत आहे. ते समयीं पुनः त्यानें विचारिलें कीं. निश्चय सांग. त्यास त्यानें उत्तर केलें. जे या समयीं अवर कांटा आणि मिन्युट कांटा हे दोनी एकत्र आहेत, यावरून समज.

एक अवरांत अवर कांटा पूर्ण परिघाचा $\frac{१}{१२}$ चालतो आणि मिन्युट-कांटा एक अवरांत सगळा परिघ अथवा $\frac{१२}{१२}$ चालतो. (उत्तर ५ .. [illegible] मिन्युट.

विसावा. २० मनुष्यें १२ दिवसांत जें काम करितील त्याचें [illegible] काम पूर्ववेळेंच $\frac{१}{२}$ त करणें तर [illegible] मनुष्यें असावीं. (उत्तर ३०० मनुष्य.

एकविसावा. कोणी एक मनुष्यानें मरण समयीं आपले द्रव्याचा $\frac{१}{८}$ एक पुत्रास देऊन जें बाकी राहिलें त्याचें $\frac{१}{२}$ दुसरे पुत्रास दिलें आणि जें बाकी राहिलें तें बायकोस दिलें. पुढें पाहतां त्या दोन पुत्रांचे वांट्याची वजावाकी ५१४२ रुपये १ पावला ३३ रेस इतकी आहे. तेव्हां बायकोस किती पावलें तें सांग.

रु. पा. रे.
उत्तर.

बाविसावा. कोणी मनुष्यानें मरण समयीं आपले द्रव्याचे $\frac{१}{२}$ एक पुत्रास आणि बाकी राहिलें तें दुसरे पुत्रास देणें असें लिहून मरण पावला. पुढें ते दोघे पुत्र द्रव्य वांटून घेऊं लागले. तों एकास दुसऱ्यापेक्षां १२०० रु. अधिक आले ते

त्यां सगळें द्रव्य कितीतें सांग. (उत्तर, ४०००० रुपये.

तेविसावें, मुंबई आणि पुणें यांचेमध्य अंतर समारानें १०० मैल आहे. आतां अ. आणि ब, हे दोन सांडणी स्वार या दोन स्थळांहून एकदांच निघाले. ते असे कीं अ, मुंबईहून निघाला तो पुण्यास जाणारा, आणि ब, पुण्याहून निघाला तो मुंबईस जाणारा. पुढें ते निघाल्या पासून ७ अवरानीं मार्गी परस्पर भेटले, तेव्हां असें कळलें कीं ब पेक्षां अ दर अवरास १/२ मैल अधिक चालिला. तेव्हां यावरून ते उभयतां सांडणी स्वार दर अवरास किती किती मैल चालिले.

उत्तर. ७ ११/२८ मैल, अ, आणि ६ २५/२८ मैल. ब.

चोविसावा, पुणें आणि पंढरपुर यांचेमध्यें अंतर समारानें १३० मैल आहे आतां प्रातः काळीं आठ अवर वाजतांच पंढरपुराहून अ, जासूद निघाला पुण्यास जाणारा, तो दर अवरास ३ मैल चालतो आणि त्याच दिवशीं सायंकाळीं ४ अवर वाजतांच पुण्याहून ब जासूद निघाला पंढरपुरीं जाणारा. तो दर अवरास ४ मैल चालतो. तेव्हां या दोघांची मार्गी पंढरपुरापासून किती मैलांवर भेट होइल. (उत्तर, पंढरपुरापासून ६९ ३/७ मैलांवर.

पंचविसावा, १०० आंबे एकेक यार्डाचे अंतरानें सरळ रेषेंत ठेविले आहेत, आणि प्रथम आंब्या पासून एक यार्डाचे अंतरानें पाटी ठेविली आहे, ते समयीं एकानें दुसऱ्यास सांगितलें कीं प्रति खेपेस १ एक आंबा पाटींत ठेवावा तर अशारीतीनें सर्व आंबे त्या पाटींत येत पर्यंत त्या मनुष्यास किती चालावें लागेल तें सांग. (उत्तर. मैं. ५ . . यार्ड. १३००

सविसावा, विलायतेकडेस इतालीया देशांत घड्याळें आहेत. तेथें, अहोरात्र मिळून एकापासून २४ पर्यंत वाजतात तेव्हां अवर कांट्याची १ प्रदक्षिणा होते त्या प्रदक्षिणेंत किती टोले पडतात तें सांग. (उत्तर. ३०० टोले.

सत्ताविसावा, शेषयानावाचा १ मनुष्य होता. त्यानें आपले बुद्धीबळानें अपूर्व बुद्धबळाचा खेळ उत्पन्न करून आपले राजास दाखविला, ते समयीं तो खेळ पाहून राजा अतिसंतुष्ट झाला. आणि त्याला माग म्हणाला, तेव्हां त्यानें मागितलें कीं या बुद्धबळाचे पटास ६४ कोष्टक आहेत, तर पहिले कोष्टकास १ गहूं दुसऱ्या कोष्टकास २ तिसऱ्यास ४ या प्रमाणें प्रति कोष्टकास दुपटीनें वाढत असे ६४ पर्यंत जे गहूं होतील, त्यांचें द्रव्य मला द्यावें. तें राजानें मान्य केलें. तेव्हां जर २००७५ गहूं एक शेरांत राहतील. तर दर मणास दोन रु. प्रमाणें त्या सर्व गव्हांचे किती रुपये होतील. (उत्तर, रु. १८२८७१४००४५०५७ . . . पा. २ . . . रे. १८

अव्यक्तिसाचा. कोणी एक मनुष्याचें धनांकांपैकी [illegible] येथें तें [illegible] रुपये प्रथम [illegible] आणखी [illegible] ठेवले, बाकी उरले [illegible] रु. [illegible] इतके झाले तेव्हां त्यापाशीं किती रुपये होते ते सांग.

उत्तर, ४०००० रुपये.

कर्जफेडीचा साचा, कोणी एक मनुष्यानें [illegible] रुपये कर्ज घेतलें. नंतर कांहीं [illegible] रुपये दिले. इतक्यानें व्याज सुद्धां तें कर्ज फिटलें तेव्हां दर साल दरशेकडा व्याजाचा दर काय तो सांग.

उत्तर, ५ रुपये.

[illegible] साचा, १०००० रुपये आहेत. अ, ब, क, या तिघांस वांटून द्यावे ते असे कीं अ ला क, हून १२०० रुपये अधीक मिळतील, आणि ब ला क, हून ५०० रु. अधिक मिळतील, ते त्या तिघांत कोणास किती रु. येतील ते सांग.

उत्तर. अ ४४५० ब ३७५० क ३२५० रुपये.

[illegible] साचा, कोणी एक मनुष्याजवळ घड्याळ होतें, त्यास इसमानें विचारिलें कीं, या घड्याळांत किती वाजले आहेत. तेव्हां तो सांगतो जे दुपारचे १२ अथवा मध्यान्हापासून हा वेळ पर्यंत जो काळ गेला, तो या वेळेपासून रात्रीचे बारा वाजेपर्यंत जो काळ आहे त्याचें [illegible] आहे तेव्हां घड्याळांत किती वाजले सांग

उत्तर [illegible] मिनुटें.

[illegible] साचा, [illegible] कोणा एकाजवळ मलमलीचें [illegible] होतें [illegible] किंमत १२००० [illegible] त्यानें त्यांतून [illegible] विकलें, आतां बाकी राहिलें भागाचे [illegible] रुपये होतील.

उत्तर. [illegible] त्याची किंमत १८५० रुपये

[illegible] साचा, १२०० बिघे जमीन अ, ब, क, या तिघांस वांटून द्यावयाची आहे. [illegible] की, ब ला अ हून १०० बिघे अधिक [illegible] क ला ब हून ५० बिघे अधिक मिळेल तर त्यांतून कोणास किती येईल ते सांग.

[illegible] अ ला. ३१२ [illegible] ब ला ४१२ [illegible] क ला [illegible] बिघे

[illegible] साचा. ती संख्या काय आहे कीं, ज्या संख्येंतून [illegible] बाकीत [illegible] मिळविलें तर बेरीज १० होईल

उत्तर [illegible]

[illegible] साचा. एक संख्या अशी आहे कीं त्या संख्येस [illegible] गुणिलें असतां गुणाकार [illegible] होतो [illegible] त्या संख्येचा [illegible] काय ते सांग

[illegible] साचा, [illegible] रुंदीचा [illegible] आणि [illegible] पाहिल्यावर बरोबर [illegible]

उत्तर,

[illegible] साचा [illegible] व्याज [illegible] १२५०० [illegible]

अडतिसावा. कोण्या गृहस्थानें मरणसमयीं आपलें द्रव्य, अ, ब, क, या तीन पुत्रांस वांटून दिलें. तें असें कीं जेव्हां ब,ला ३ तेव्हां अ,ला ४ आणि जेव्हां ब,ला ६ तेव्हां क,ला ५ या प्रमाणें. आतां अचा भाग ४०००० रुपये निघाला, तेव्हां सगळें द्रव्य कितीतें सांग.

उत्तर. ९५००० रुपये.

एकुणचाळिसावा. एक कुत्रा आणि एक ससा असे एके रानांत ४० याडांचे अंतरानें होते, तों ससा कुत्र्यास पाहून भयानें पळूं लागला, त्यास आरंभीं कुत्र्यानें पाहिलें नव्हतें. परंतु ४० सेकंद गेल्यानंतर पाहिलें, आणि त्यास धरावें या बुद्धीनें त्याचे मागें धांवूं लागला, या प्रमाणें दोघे धांवूं लागले. त्यांत सशाचे धांवण्याचा वेग १ अवरांत १० मैल आणि कुत्र्याचे धांवण्याचा वेग १ अवरांत १८ मैल आहे. पुढें कुत्र्यानें त्या सशास धरिलें तेव्हां कुत्रा चालूं लागल्या पासून सशास धरी पर्यंत मध्यें काळ किती गेला, व कुत्रा किती चालिला तें सांग.

उत्तर. ६० $\frac{५}{२२}$ सेकंद आणि ५३० याडें.

चाळिसावा. दोन भले मनुष्यांचे पुत्र द्रव्यहीन होते त्या दोघांस एका सरकारांत एक समयींच दोन स्थळीं समान पगाराचा उद्योग मिळाले तेव्हां त्यांचीं वयें १८ वर्षांचीं होतीं, त्यांत एक अविवेकी तो आपले पगारा पेक्षां प्रतिवर्षी १०० रुपये अधीक खर्च करी, परंतु त्याचे मनांत लोकांचा पैका बुडवावा ही गोष्ट वाईट समजून प्रतिवर्षी त्या अधिक खर्च केले रुपयाचें दरशेंकडा दरवर्षास व्याज रुपये ५ प्रमाणें स्वतां लिहून आपले जिवाचा विमा दरशेंकडा रुपये ६ प्रमाणें करीत असे.

आणि दुसरा विवेकी होता तो प्रतिवर्षी आपले पगारांतून १०० रुपये संग्रह करून ते दरशेंकडा दरसाल व्याज रुपये ५ प्रमाणें वाढवीत असे.

नंतर त्या दोघांचीं ५० पन्नास वर्षांचीं वयें झालीं तेव्हां परस्पर भेटले, ते समयीं सरकारांतून प्रत्येकाचा पगार प्रतिवर्षी ८०० रुपये होता. ते परस्पर गोष्टी करूं लागले. तेथें अविवेक्यानें पगारापेक्षां अधीक खर्च केला ही आपली चूक पदरीं घेऊन निश्चय केला कीं, आज पासून जुनें कर्जाचें व्याज व जीवाचे विम्याचा ऐवज देऊन जें पगारांतून बाकी राहील तितक्यांत आपला खर्च चालवीन. आणि विवेक्यानें निश्चय केला कीं, आज पर्यंत संग्रह झाला आहे. तितकें मुद्दल राखून त्याचें व्याज व सरकार संबंधी पगार हें सर्व खर्च करीन.

आतां पुढें अविवेक्यास प्रतिवर्षी खर्चास किती रुपये राहतात. आणि विवेकी याजवळ किती रुपये संग्रह आहे, व प्रति वर्षी त्याचा खर्च किती होतो, तो सांग.

			आ.	पै.	
	अविवेक्यास प्रतिवर्षी खर्चाकरितां	[illegible]	२.	१६	राहातात
उत्तर.	विवेक्यास प्रति वर्षी खर्चाकरितां	११७६.	१.	८३	होतात.
	आणि याजपाशीं संग्रह	७५२९.	[illegible]	५०	आहे.